पाहिजेत
१. अकाऊंटंट क्लार्क
२. गार्डनसाठी महिला
३. किचन हेल्पर
४. रिसेप्शनसाठी व्यक्ती
अर्जासह समक्ष भेट
हॉटेल साईइन, चोंढी, अलिबाग-रेवस रोड, अलिबाग

रायगड, बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹




## सोशल मीडियावर आमदारांची खिल्ली, बांधकाम विभागाची पोलखोल

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

गेल्या तीन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात धुव्वाधार पावसाला सुरुवात झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे पुन्हा एकदा साम्राज्य दिसू लागले आहे. बांधकाम विभागाने काही दिवसांपूर्वीच रस्त्यांवरील खड्डे बुजवल्याचा दावा केला होता. मात्र पुन्हा पावसाने दणका दिल्याने बांधकाम विभागाच्या दाव्याची पोलखोल झाली आहे. तर स्थानिक आमदार यांच्या आश्वासनांची सोशल मिडियावर खिल्ली उडवली जात आहे. अलिबाग-रेवदंडा मार्गावर आरसीएफ कॉलनीजवळ पावसाला सुरुवात झाल्यापासूनच मोठमोठे खड्डे पडले आहे. याबाबत अनेकदा तक्रारी करुनही बांधकाम विभागाने तात्पुरती मलमपट्टी लावून नागरिकांना चुना लावला. अखेर नागरिकांनी •> पान २ वर



वेधक

## मच्छिमारांना सतर्कतेचा इशारा

**रायगड :** गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसाचा जोर मंगळवारीही कायम असून समुद्र खवळलेला आहे. त्यातच समुद्रातील वाऱ्याचा वेग प्रती ताशी ४५ ते ५० किमी राहणार असून तो प्रती ताशी ६५ कि.मी.पर्यंत वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे राज्यातील मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, अशा सूचना मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने राज्यातील कोकण किनारपट्टीवर २२ ऑगस्टदरम्यान वादळी वाऱ्याची शक्यता वर्तवली आहे. या कालावधीदरम्यान वाऱ्याचा वेग प्रती ताशी ४५ ते ५० कि.मी. राहणार असून तो प्रती ताशी ६५ कि.मी.पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. •> पान २ वर

## गाढी नदीला पूर

**नवीन पनवेल :** गेल्या तीन ते चार दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पनवेलच्या गाढी नदीला मोठा पूर आला आहे. चिपळे येथील पुलाखालून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. गाढी नदीला मोठ्या प्रमाणात पाणी आलेले दिसत आहे. तसेच नांदगाव येथील पुलावरून पाणी गेले आहे. गेल्या तीन ते चार दिवसांपासून पनवेल परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे. एकूण पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. पनवेल परिसरातील गाढी नदी दुथडी भरून वाहत आहे. शक्य असल्यास नागरिकांनी घराबाहेर पडू नये असे आवाहन करण्यात येत आहे. गाढी नदीला महापूर आल्याने चिपळे येथील नदीला महापूर आला आहे. माथेरानच्या डोंगरालगत जास्त पाऊस पडत असल्याने ते पाणी गाढेश्वर धरणात येते आणि •> पान २ वर

# आभाळ फाटलं, पाणी दाटलं



## नद्यांना पूर, दरडीमुळे महिलेचा मृत्यू, जनजीवन विस्कळीत

| रायगड | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय तसेच जीवितहानीला सामोरे जावे लागत आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्राला पावसाने झोडपले असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नद्यांना पूर आला असून यामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये काही लोकांना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक पावसामुळे जमीनदोस्त झाले आहे. पावसाने पिकच हिरावून नेल्यामुळे ना पिक ना भाव अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना पावसाने झोडपले. •> पान २ वर

## आमदार आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुर्दैवी घटना

### शेकापच्या माध्यमातून न्याय मिळवून देणार



प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे दरड कोसळून एका वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून गावाला न्याय मिळवून देण्यात येईल. तातडीने दरडग्रस्तांचे स्थलांतर करून संरक्षक भिंत बांधण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. शेकापच्या मार्फत मदतीचा हात दिला जाईल. ग्रामस्थांच्या सर्व मागण्या मान्य करण्यास प्रशासन व सरकारला भाग पाडू,अशी ग्वाही शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिली.

### प्रशासन आणि आमदारांच्या भूमिकेबाबत नाराजी

मिठेखार येथे संरक्षक भिंत निर्माण व्हावी, यासाठी विद्यमान आमदार दळवी यांनी प्रयत्न केले. गेल्या सहा वर्षापासून सत्तेत असताना मिठेखारच्या समस्येकडे गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे दरड कोसळून मिठेखारमधील महिलेचा मंगळवारी सकाळी मृत्यू झाला. गावात मृत्यूचा आक्रोश असताना, विद्यमान आमदारांच्या पत्नी मानसी दळवी यांनी राजकीय तमाशा केला. राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. मात्र ग्रामस्थांनी धारेवर धरत तुमच्या सहानुभूतीची अजिबात गरज नाही, असे म्हणत प्रशासन आणि आमदारांच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली



“मिठेखार येथील घडलेली घटना दुर्दैवी आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या दोषींवर आक्रमकपणे कारवाई झाली पाहिजे. साळाव-तळेखारच्या रस्त्याची अवस्था बिकट आहे. चिखलाचा रस्ता आहे. गरीबांच्या सर्वसामान्यांच्या जीवाची किंमत सत्ताधाऱ्यांसह प्रशासनाला नाही. सर्वसामान्यांना वेठीस धरणे कदापी सहन करणार नाही.
– चित्रलेखा पाटील, प्रवक्त्या, शेकाप”

## ‘अतिवृष्टीत यंत्रणांनी अलर्ट रहावे’

**रायगड :** भारतीय हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला असून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील दरडप्रवण अन पूरप्रवण गावांवर जिल्हा प्रशासनाने अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी विभागप्रमुखांची बैठक घेऊन प्रशासनाच्या तयारीचा, उपाययोजनांचा आढावा घेतला. नद्यांजवळच्या गावातील प्रशासनाने घेतलेली खबरदारी, पर्यायी व्यवस्था, यंत्रणेची सुसज्जता याची माहिती घेतली.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, जिल्हा प्रशासन कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी तयार आहे. तहसीलदारांना आवश्यक त्या साधन, सुविधा सज्ज असतील याची खात्री करण्यास सांगितले आहे. आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्याची कार्यवाही •> पान २ वर

### आज शाळांना सुट्टी

हवामान विभागाने रायगड जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जाहीर केल्याने रायगडचे जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय आणि खाजगी शाळा, महाविद्यालयांना २० ऑगस्ट रोजी सुट्टी जाहीर केली आहे, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी दिली.

## रिलायन्सची कॉलनी पाण्यात





**रिलायन्स व एल अँड टी कंपनीच्या नियोजनशून्य कामाचा फटका**

**तळ मजल्यावर राहणाऱ्या कुटुंबांचे अतोनात नुकसान; कुटुबाचे केले स्थलांतर**

महेश पवार
| नागोठणे |

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नागोठणे येथील प्रकल्पातील अधिकाऱ्यांसाठी कंपनीच्या जुन्या निवासी संकुलासमोरच महाकाय कॉलनी बांधण्यात आली आहे. मात्र ही कॉलनी बांधण्यासाठी नावाजलेल्या एल ॲन्ड टी कंपनीला करोडो रुपयांचे कंत्राट देणाऱ्या रिलायन्स कंपनी व्यवस्थापन व कॉलनी बांधणाऱ्या एल अँड टी कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनाचा फटका सध्या कॉलनीत राहणाऱ्या अधिकारी वर्गाच्या कुटुंबांना •> पान २ वर

## पोलीस ठाणे पाण्यात

**उरण :** तालुक्यात दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण तालुका विस्कळीत झाला आहे. नागरिक, दुकानदार, रस्त्यांवरील प्रवासी एवढंच नव्हे तर पोलिसही या पावसाच्या तडाख्यात सापडले आहेत. •> पान २ वर

## पुरात अडकलेल्या आदिवासींची सुटका



**पाली/बेणसे :** मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्याला झोपून काढले आहे. या अतिवृष्टीमुळे सोमवारी (दि.१८) रात्री माणगाव तालुक्यातील खांदाड आदिवासीवाडी पाण्याने वेढली गेली. स्थानिक प्रशासन, पोलीस व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या रेस्क्यू टीमने या पुराच्या पाण्यात अडकलेल्या ३० नागरिकांची सुखरूप सुटका केली. मंगळवारी (ता. १९) पहाटे ३ वाजेपर्यंत हे रेस्क्यू ऑपरेशन सुरु होते.

अडकलेल्या नागरिकांमध्ये छोटी मुले, वृद्ध नागरिक, रुग्ण व महिलांचा समावेश होता. याबाबत सविस्तर माहिती अशी की, अतिवृष्टीमुळे खांदाड आदिवासी वाडीत पाणी शिरण्यास सुरुवात झाली होती. महसूल प्रशासन, पोलीस विभाग तसेच स्थानिक नागरिकांनी वाडीतील रहिवाशांना सुरक्षित बाहेर पडण्याचे आवाहन केले. यामध्ये काही •> पान २ वर

## कशेडीत कोसळली दरड

**पोलादपूर :** कशेडी घाटातील भोगावगावच्याहद्दीतीलसन२००५ पासून सातत्याने रस्ता खचण्याने डेंजर झोन म्हणून ओळखला जाणारा रस्ता आणखी खचला असून या ठिकाणी मंगळवारी दरड कोसळली. यंदा अवकाळी पाऊस सुरू झाल्यापासून मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण झालेल्या एनएच ६६ या नवीन महामार्गावर तर कधी जुन्या एनएच १७ महामार्गावर दरडी कोसळत आहेत.

मे २००५ मध्ये खेड येथील एका कन्स्ट्रक्शन •> पान २ वर

## झेनिथ धबधब्यावर अडकलेले १५ पर्यटक सुखरूप

**खोपोली :** खोपोली येथील झेनिथ धबधब्यावर पाण्यात आनंद घेण्यासाठी मंगळवारी (दि.१९) गेलेल्या १५ जणांना खोपोली पोलीस, हेल्प फाऊंडेशन व खोपोली फायर ब्रिगेडच्या मदतीने सुखरूप बाहेर काढण्यात आले असून यातील ४ पर्यटक हे तमिळनाडूमधील असल्याचे समोर आहे. तर सर्व पर्यटकांना खोपोली पोलिसांनी समज देत घरी पाठवले आहे.



खोपोलीत अडकलेल्या १५ पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, अमोल कदम, सौरभ घरत, फरहान कर्जीकर, प्रतीक घरत तसेच •> पान २ वर

**दरडग्रस्तावर घरपट्टीची दरड** | **ग्रामस्थ इर्शाळवाडीवर परत जाण्याच्या तयारीत**

# सरकारच्या महालापेक्षा झोपडीच बरी

संतोषी म्हात्रे
| खोपोली |

१९ जुलै २०२३ रोजी खालापुरातील इर्शाळवाडीवर दरड कोसळून ८४ जणांचा मृत्यू झाला. त्यापैकी ५७ जणांचे मृतदेह अद्याप सापडले नसुन मातीत गाडले गेले आहेत. कोसळलेल्या १३९ लोकवस्तीच्या दरडग्रस्तांना शासनाने ४३ टुमदार घरं बांधून पाणी, रस्ता, वीज दिली. रोजगार नसल्याने उपासमारीची वेळ आली असतानाच •> पान २ वर



### एकाकी जीवनात नव्याने सारीपाट खेळ मांडला

दरडग्रस्तांना उदरनिर्वाह, नुकसान भरपाईच्या आर्थिक मदतीवर करावा लागत आहे. ती पुंजी संपली तर पुढे काय? अशा चिंतेत दरडग्रस्त दिवस ढकलत आहेत. तुमच्या राजमहालापेक्षा जंगलातील झोपडीच बरी. त्या ठिकाणी जंगली रानमेवा, मासे, खेकडा, चिंबोऱ्यांवर जीवन जगता तरी येते. आम्हाला आमची झोपडी प्यारी असे दरडग्रस्तांचे म्हणणे आहे.

### सरकारी नियमानुसार घरपट्टी

याबाबत चौक ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी गणेश मोरे यांना विचारणा केली असता ग्रामपंचायत कर नियमानुसार लावले असल्याचे सांगितले. तर सामाजिक कार्यकर्ते फिरोज शेख यांनी सांगितले की, दरडग्रस्तांना लावलेली घरपट्टी खुप जास्त आहे. ग्रामपंचायत सभेत याबाबत विचारणा करण्यात येईल. तसेच नानीवली व इर्शाळवाडी या गावांसह मोरबे धरणबाधीत गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करावी, अशी मागणी केली जात आहे.



ATTENTION X[th] PASS, XII[th] PASS, GRADUATES & WORKING PROFESSIONALS
Estd. 1999 | Suryadatta Education Foundation's
SURYADATTA GROUP OF INSTITUTES, PUNE
SURYADATTA Enriching Career and Enhancing Lives Since 1999
SURYADATTA Enabling Holistic and Sustainable Development Since 1999
TRUSTED NAME FOR QUALITY EDUCATION & HOLISTIC DEVELOPMENT @ AFFORDABLE FEES FOR ASSURED SUCCESS
ARTIFICIAL INTELLIGENCE & CYBER SECURITY MODULES FOR ALL
ADMISSION OPEN



12+ Unique World Record Endorsed by 100+ World Record Agencies | 100+ National & International MOUs | 1 Lakh + Students and Alumni Across the Globe | SURYADATTA Celebrating - 2025 27 years of Academic Excellence Enriching Career & Enhancing Lives! | 220+ National & International Awards | 300+ National & International Patents | 1025+ Recruiters

SURYADATTA OFFERS NEXT GEN SKILL SET, BASED TECH CERTIFICATE MODULES IN AI, CYBER, BLOCKCHAIN, FINTECH, DRONE, AVIATION ETC FROM INDUSTRY PROFESSIONALS & ORGANIZATIONS

Arts
• BA • MA
8956932402, 8378998127, 8956932400

Commerce
• B.Com • M.Com
• B.Com - Computer Application
• B.Com - Business Management
• B.Com - International Business
8956932419, 8956932402, 8956932400

Management
• BBA • BCA
• MBA • MCA
• PGDM
7262011114, 8956932412, 8956932402

Hotel Management
• B.Sc. Hospitality Studies
• M.Sc. Hospitality Studies
• Diploma in Hotel Management
8956932408, 8956938603, 8956932400

Design & Animation
• B.Sc. Fashion Design
• B.Sc. Interior Design
• B.Sc. Animation
• Diploma in Interior Design
8956932405, 8956932416, 8956932402

Event Management
• Diploma & Advanced Diploma
8956932415, 8378998124, 8956932400

OUR CONSTANT SOURCE OF INSPIRATION



Mrs. Sushama S. Chordiya & Prof. Dr. Sanjay B. Chordiya. Managing Trustee SEF tying Rakhi to H.E. Hon'ble President of India, Smt. Droupadi Murmu ji.

Physiotherapy
• B.P.Th.
7262011338, 7262011774, 8956932400

Pharmacy
• D. Pharm • B. Pharm
7262011339, 7499915674, 8956932400

Nursing
• ANM
7391000526, 7391000533, 7776072000

Dieticians
• Diploma in Yoga Naturopathy and Dietetics
9112297606, 7391000526, 8956932400

Suryadatta Global Finishing School
Unique Liberal Arts Program for Global Market Place
9763266829

Cyber Security, AI & ML Computer Science,
• B.Sc. Cyber Security
• M.Sc. Cyber Security
• B.Sc. Cyber & Digital Science
• B.Sc. AI & ML
• B.Sc. Data Science
• M.Sc. Data Science
• B.Sc. Computer Science
• M.Sc. Computer Science
• B.Sc. Computer Application
• M.Sc. Computer Application
• B.Sc. Information Technology
• M.Sc. Bioinformatics
• M.Sc. Media & Comm. Studies
8956932419, 8956932402, 8956932400

Law
• B.A.LL.B • B.B.A.LL.B.
• LL.B. • LL.M.
Diploma in
▸ Cyber Laws ▸ Taxation Laws
▸ Labour Laws & Labour Welfare
▸ Intellectual Property Rights Laws
▸ Certificate Course in Forensic Science & Medical Jurisprudence
9371096506, 8956932411, 8956932400

Ph.D. in Management
• Ph.D. in Management
020-67901300, 8956932400

We are open on all Sundays | Hostel Facilities Available
UNIQUENESS Prestigious Academic MOUs / Tieups / Membership with National & International Organizations / Universities
Pioneering Education for the Future: Shaping trailblazing professionals through modern, interdisciplinary learning frameworks.
Dynamic Industry-Academia Interface: Bridging the gap between education and enterprise to create industry-ready graduates
Engaging and Experiential Learning: Encouraging immersive, hands-on, & collaborative academic experiences.
For details Scan
Follow us on www.suryadatta.org For Career Guidance : 8956932400 / 9763266829

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# गेटवे-मांडवा फेरीबोट १ सप्टेंबरपासून

## तीन महिन्यांच्या बंदीनंतर होणार सुरुवात; गणेशोत्सवासाठी येणाऱ्यांना जलवाहतुकीची प्रतीक्षा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**तीन महिन्यांच्या बंदीनंतर गेटवे ते मांडवा जलवाहतूक १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. गौरी-गणपतीच्या सणासाठी अलिबाग- मुरूडमधील चाकरमान्यांचा हा सर्वात आवडीचा मार्ग असला तरी यंदा गणेश चतुर्थीला येणाऱ्यांना या सेवेचा लाभ घेता येणार नाही; मात्र परतीचा प्रवास फेरीबोटीने सुखरूप करता येणार आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाचे प्रमाण कमी होऊन फेरीबोट निर्धारित वेळापत्रकानुसार सुरू होईल, असा अंदाज जलवाहतूक संस्थांचा आहे.**



मॉन्सून सुरू होण्यापूर्वी गेटवे ऑफ इंडिया ते मांडवापर्यंतची फेरीबोटसेवा बंद होती. मेरिटाइम बोर्डाने १ सप्टेंबरपासून या मार्गावरील फेरीबोट सुरू करण्यास अनुमती दिली आहे. त्यानुसार अजंठा, मालदार, पीएनपी या वाहतूक संस्थांनी आपल्या फेरीबोटी सज्ज ठेवल्या आहेत. मागील वर्षी घारापुरी बेटाकडे जाणाऱ्या एका प्रवासी बोटीला झालेल्या दुर्घटनेनंतर मेरिटाइम बोर्डाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काही कडक अटी घालून दिल्या आहेत. त्या अटींची पूर्तता आणि बोटींची दुरुस्ती करूनच यंदा फेरीबोटी चालवण्यास अनुमती देण्यात आली आहे. गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा हा सर्वात लोकप्रिय जलवाहतूक मार्ग आहे. या मार्गावर दररोज हजारो पर्यटक आणि स्थानिक नागरिक प्रवास करीत असतात. या सेवेवर अलिबाग, मुरूड तालुक्यातील पर्यटन व्यवसाय अवलंबू असल्याने फेरीबोट केव्हा सुरू होणार याची सर्वांनाच प्रतीक्षा असते.

यंदा बुधवार (ता. २७) रोजी गणेश चतुर्थीला गणपतीचे आगमन होत आहे. त्यानिमित्ताने येणाऱ्या भक्तांना या फेरीबोटीचा वापर करता येणार नाही. १ सप्टेंबरपासून फेरीबोट सुरू झाल्यानंतर गौरी विसर्जन झाल्यानंतर परतीचा प्रवास सुखरूपपणे करता येणार आहे. याचे नियोजन आतापासूनच अनेकजण करू लागले आहेत.

**हवामान शांत होण्याची प्रतीक्षा**

मागील तीन दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचे प्रमाण वाढलेले आहे. हवामान विभागानेही त्याचप्रमाणे अंदाज व्यक्त केला असल्याने १ सप्टेंबरपासून जलवाहतूक वेळेत सुरू करण्याचा प्रयत्न फेरीबोट संस्थांचा आहे.

गेट वे ते मांडवा हा जलमार्ग समुद्रातून जातो. मॉन्सून कालावधीत समुद्राला उधाण येत असल्याने उसळणाऱ्या उंच लाटांमुळे प्रवासी फेरीबोटी उलटण्याची शक्यता जात असते.

> **प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मेरिटाइम बोर्डाने कडक धोरण अवलंबणे गरजेचे आहे. यासाठी फेरीबोटींची दुरुस्ती, बोटीमध्ये पुरेशे लाइफ जॅकेट असणे आवश्यक आहे. यासंदर्भात मेरिटाइम बोर्डाच्या अधिकाऱ्यांशी वारंवार चर्चा केल्यानंतर यश येत आहे. यात आणखीन आधुनिक सुविधा करणे गरजेचे झाले आहे.**
> **- चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, जलवाहतूक प्रवासी संघटना.**

> **१ सप्टेंबरपासून गेटवे ते मांडवा फेरीबोट सुरू करण्यास मेरिटाइम बोर्डाने अनुमती दिलेली आहे. यादरम्यान, हवामान शांत होणे गरजेचे आहे. जेव्हा समुद्र खवळलेला आणि वाऱ्याचा वेग जास्त असतो, तेव्हा प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सेवा बंद करावी लागते.**
> **- आशिष मानकर, बंदर निरीक्षक, मांडवा.**

प्रवाशांच्या सुरक्षेसाठी साधारणपणे २६ जुनपासून दरवर्षी फेरीबोटसेवा बंद केली जाते; मात्र यादरम्यान आकाराने मोठी असलेली रो-रो बोट सुरू असते. नारळी पौर्णिमेनंतरही अनेकवेळा समुद्र शांत झालेला नसतो. त्यामुळे ही सेवा थेट सप्टेंबरमध्ये सुरू केली जाते, अशी माहिती पीएनपी मेरिटाइम सर्व्हिसेसचे व्यवस्थापक संजय भोपी यांनी दिली.

# वादळी वाऱ्यांमुळे मासेमारी बोटी अडकल्या

**। उरण । वार्ताहर ।**

वादळी पाऊस आणि खराब हवामानामुळे येथील करंजा आणि मोरा यासह अनेक बंदरातील मासेमारीसाठी रवाना झालेल्या शेकडो मासेमारी बोटी कोकण किनारपट्टीवरील अनेक बंदरात अडकल्या आहेत.

या बदललेल्या परिस्थितीमुळे मासेमारी साठी करण्यात आलेला ३ ते ४ लाखांचा खर्च वाया गेला आहे. १ ऑगस्टला जून व जुलै या दोन महिन्यांच्या खोल समुद्रातील मासेमारी वरील बंदी उठल्यावर दोन महिन्यांनी हंगाम सुरू झाला आहे.

खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या शेकडो बोटी विविध बंदरातून मासेमारीसाठी रवाना झाल्या होत्या. मात्र दोन तीन दिवसांपासून वादळी पाऊस व खराब वातावरणामुळे मच्छिमारांना मिळालेल्या आदेशानुसार येत्या २२ ऑगस्टपर्यंत वादळी पाऊस व खराब हवामानाची स्थिती अशीच राहणार आहे.

**■ शासनाने नुकसानभरपाई देण्याची मागणी**

त्यामुळे २२ ऑगस्टपर्यंत खोल समुद्रातील आणि पर्सियन मासेमारी बंद ठेवावी लागणार असल्याची माहिती वेस्ट कोस्ट पर्ससीन नेट असोसिएशन संचालक रमेश नाखवा यांनी दिली आहे.

मासेमारी करण्यासाठी जाणाऱ्या एका बोटीसाठी किमान ४ लाख रुपये खर्च येतो. यात सर्वात अधिक खर्च हा डिझेलचा असतो.

त्याचप्रमाणे बर्फाचेही दर वाढले आहेत. बोट मालक आणि बोटीवर काम करणारे खलाशी व चालक तांडेल यांच्यात खर्च जाऊन मिळणाऱ्या नफ्याचा निम्मा निम्मा वाटा हा समान वाटण्यात येतो. एका फेरीसाठी किमान चार ते पाच दिवस लागतात. अनेक संकटांचा सामना करीत मासेमारी करावी लागत आहे.

पान १ वरुन

## आभाळ फाटलं, पाणी दाटलं

मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे दरड कोसळून वृध्द महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. साळाव बिर्ला मंदिर नजीक मिठेखार हे गाव यापूर्वी तेथील डोंगराला भेग पडल्याने दरडीच्या छायेत असल्याची नोंद शासनाकडे आहे. सन २०१९ साली दरडीच्या भीतीने येथील गावातील काही घरांना तात्पुरते स्थलांतरीत करण्यात आले होते. त्यानंतर मात्र शासनाने पुरते दुर्लक्ष केले. त्यावेळी दरडी पडून नुकसान झालेल्या घराची भरपाईसुध्दा शासनाने दिली नाही. मात्र अद्यापी दरडीच्या छायेत असलेल्या मिठेखार गावात, मंगळवारी (दि.१९) सकाळी ८.३० चे दरम्यान डोंगरातील दरड कोसळली. या दुर्घटनेत मिठेखार गावातील एका घराच्या पाठीमागील बाजूस पडलेल्या दरडीच्या ढिगाऱ्याखाली ७५ वर्षीय वृध्द महिला विठाबाई मोतीराम गायकर यांचा मृत्यू झाला. आमदारांनी गेली पाच वर्षे याकडे दुर्लक्ष केल्याने ग्रामस्थ पेटून उठले होते. या घटनेची माहिती मिठेखार पोलीस पाटील यांनी पोलीस ठाण्याकडे दिली. त्यावेळी रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरिक्षक श्रीकांत किरविले यांनी लागलीच घटनास्थळी भेट दिली. यावेळी मिठेखार गावात पंचक्रोशीतील संप्तत जमाव जमा झाला आणि शासनाच्या दुर्लक्षतेबाबत संप्तत प्रतिक्रिया व्यक्त केल्या. घटनास्थळी अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, मुरूड तहसिलदार आवेश डफळ, निवासी नायब तहसीलदार संजय तवर, अलिबाग पंचायत समिती गटविकास अधिकारी मंगेश पाटील, अभियंता मुरूड पंचायत समिती आशिष मुकणे व साळाव तलाठी आदी शासकीय अधिकारी घटनास्थळी पोहचले. यावेळी शासकीय अधिकाऱ्यांनी वृध्द महिलेच्या कुटूंबाला तातडीने शासकीय मदत निधीचा धनादेश जाहीर केला. मात्र या घटनेनंतरही मिठेखार डोंगराला भेग गेल्याने दरड पडण्याची भिती असल्याने घटनेतील घरासह इतर काही घरांचा स्थलातंराचा प्रश्न उपस्थित होत आहे. गेल्या सात वर्षापासून मिठेखार गावातील संरक्षक भिंतीचा प्रस्ताव लालफितीत अडकून राहिला आहे. डोंगरालगत असलेल्या गावांच्या व नागरिकांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंत बांधण्यास प्रशासन उदासीन ठरले. आमदार आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही दुर्दैवी घटना घडली. त्याच्या निष्काळजीपणामुळे मिठेखार येथील वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला असल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.कालपासून सुरु असलेल्या पावसाने थैमान घातले आहे. मुरुड तालुक्यातील मिठेखार येथील वयोवृद्ध महिला विठा मोतीराम गायकर (७५) या त्यांच्या घरात होत्या. घराच्या मागे काहीतरी आवाज आल्यावर त्या पहाण्यास गेल्या. त्यावेळी अचानक माती दगडाचा ढिगारा कोसळून खाली आला. दरड कोसळल्याने विठा गायकर यांना गंभीर दुखापत होऊन त्या जागीच मृत पावल्या. सर्वांची धावाधाव सुरु झाली. आक्रोश, शोकाकूळ वातावरण, त्यात दरडीमुळे भयभीत गाव असताना प्रशासनाच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या निष्काळजीपणाची प्रचंड चीड अनेकांमध्ये होती. या दुर्देवी घटनेची माहिती शेकाप प्रवक्ता चित्रलेखा पाटील यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.त्यांच्या सोबत उद्धव ठाकरे गटातील बोर्लीतील नेत्या राजश्री मिसाळ, शेकापचे विक्रांत वार्डे व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याचा संताप चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला. प्रशासन आणि सत्ताधारी काय करतात, असा सवाल उपस्थित केला. मिठेखार येथे ६० घरे असून २५० हून अधिक नागरिक राहत आहेत. डोंगराच्या बाजूला असलेल्या या गावाच्या व ग्रामस्थाच्या सुरक्षेसाठी ग्रामस्थांनी मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाने संरक्षिक भिंत बांधण्याचे आश्वासन देऊन काम मंजूर केले होते. परंतु गेली अनेक वर्ष उलटूनही संरक्षक भिंत बांधण्यात आली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे संरक्षक भिंतीचा प्रस्ताव कागदावरच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**प्रशासनाचा निष्काळजीपणा**

प्रशासनाने संरक्षक भिंत यापूर्वी बांधली असती तर दरड कोसळून दुर्दैवी घटना घडली नसती. अशी प्रतिक्रया उमटत आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा फटका मिठेखार गावाला बसला आहे. त्यामुळे निष्काळजीपणा करणाऱ्या दोषींवर कारवाई व्हावी अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

**आमदारांची फक्त बघ्याची भूमिका**

मी अलिबाग मुरुड मतदार संघाचा आमदार आहे.अशा बतावण्या विद्यमान आमदार दळवी वेगवेगळ्या भाषणातून कायमच करत आले आहेत. मात्र त्यांचाच मतदार संघातील मिठेखार येथील संरक्षण भिंतीचा प्रश्न सोडवण्यास ते अपयशी ठरल्याची चर्चा जोरात सुरू आहे. फक्त बघ्याची भूमिका आमदारांनी घेतल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. डिलिव्हरी पेशन्ट, सिरिअस पेशन्ट यांना या रस्त्यावरून किती जलद आणि किती सुरक्षित नेऊ शकतो हा प्रश्न आहे. साळाव-तळेखार हा रस्ता नाही तर मृत्यूचा सापळा बनतोय. प्रशासनाला कधी जाग येणार? असे, मुरुड तालुका पुरोगामी युवक संघटना शेकाप उपाध्यक्ष, मनीष माळी यांनी सांगितले.

## अतिवृष्टीत यंत्रणांनी अलर्ट रहावे

तत्काळ करावी. तातडीने मदत व बचाव कार्य यासंबंधी यंत्रणांनी कार्यक्षमतेने काम करावे पाटबंधारे, आरोग्य, महावितरण, बांधकाम विभाग, बंदर विभाग आदी महत्त्वाच्या विभागांना त्यांनी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.सर्व शासकीय विभागप्रमुखांनी प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या सूचनेनुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोडवर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्याला देण्यात आलेल्या रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले आहे.

## खड्ड्यात खुर्ची, खुर्चीत कोण

कंटाळून त्या खड्ड्यांमध्ये खुर्ची ठेऊन बांधकाम विभागासह स्थानिक आमदारांचीही खिल्ली उडवली आहे.

पावसाने गेल्या चार दिवसांपासून अलिबागमध्ये पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली आहे. रस्त्यांवरील खड्ड्यातून मार्ग काढत नोकरीच्या ठिकाणी पोहचताना नागरिकांच्या डोळ्यांत पाणी येत आहे. रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवण्यासाठी प्रशासनाने करोडो रुपये खर्च केले आहेत. परंतु पावसाचे आगमन होताच पुन्हा एकदा रस्त्यांवर खड्डे दिसू लागले आहेत. यातून मार्ग कसा काढावा असा प्रश्न वाहन चालकांना पडत आहे. वाहनांमध्ये पाणी शिरल्याने वाहने रस्त्याच्या मधेच बंद पडत आहेत. त्यामुळे वाहन चालकांना चांगलाच त्रास सहन करावा लागत असून वाहतूक कोंडीदेखील सहन करावी लागत आहे. याबाबत नागरिकांनी प्रशासनासह आमदारांकडेही रस्त्यांचे गऱ्हाणे मांडले होते. त्यावर आमदारांनी पाऊस असेल तर प्लास्टिक टाकून तात्काळ रस्ते दुरुस्ती करावी, असे हास्यास्पद उत्तर देऊन नागरिकांची दिशाभूल केली. अखेर कंटाळलेल्या नागरिकांनी रस्त्त्यात खुर्ची टाकून चिखलात लोळणाऱ्या आमदारांची चांगलीच टेर खेचली आहे. सुरुवातीला कृषीवलने आवाज उठविताच पहिल्या पावसांतच हा रस्ता करण्यात आला होता. मात्र लगेच त्या रस्त्यावर खड्डे पडले. केवळ जाहिरात करण्यात प्रशासन खर्च करत आहे. म णसांच्या जीवाचे यांना पडलेले नाही. दोन हाणा पण स्मार्ट सिटी म्हणा, अशी गत तालुक्याची झाली आहे. अनेक ठिकाणी कागदोपत्री रस्त्यांची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडणारच, अशी चर्चा सुरु आहे.

## मच्छिमारांना सतर्कतेचा इशारा

समुद्र खवळलेला आहे. या कालावधीत मच्छिमारांनी सुरक्षेच्या कारणास्तव समुद्रात जावू नये, अशी सूचना मत्स्यव्यवसाय विभागाकडून मच्छीमारांना करण्यात आली आहे. या कालावधीत वित्त व जीवित हानी होणार नाही याची खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वादळी वाऱ्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्ह्यातील मच्छिमार, मच्छिमार सहकारी संस्था, नौका मालक यांना याबाबत सूचित करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसरात हवामान विभागाने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक घाट परिसर, सातारा घाट परिसरात अतिमुसळधार ते अतिवृष्टीची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## गाढी नदीला पूर

धरणातून ते पाणी गाढी नदीतून थेट खाडीला जाऊन मिळते. हीच गाढी नदी गेल्या काही तासांपासून दुधडी भरून वाहत आहे. मुसळधार पाऊस कोसळत असल्याने नद्यांना पूर आलेला आहे. प्रशासनाकडून सावधानतेचा इशारा दिलेला नसला तरी देखील नागरिकांनी काम नसेल तर घराबाहेर पडू नये. नांदगाव येथील रस्ता कर्नावती नदीवरील पूल हा पाण्या खाली गेला आहे. सतत पाडणाऱ्या पावसाम ुळे दोन दिवस हा रस्ता येण्या जाण्या साठी बंद आहे. गेले दहा वर्ष पंचायत समिती पनवेल आणि रायगड जिल्ह्य परिषद कडे नवीन पूलाची मागणी केली आहे. मात्र या कडे दुर्लक्ष केलं जात आहे. प्रशासन बहुदा जीवितहानी होण्याची वाट पाहत असावा असा आरोप नागरिक करत आहेत. कित्येक वेळा पाण्याचा अंदाज न आल्याने या पुलावर गाड्या अडकतात. दरवर्षी प्रमाणे नांदगाव नागरिकांना पर्यायी लांबचा मार्ग वापरावा लागतो.

## रिलायन्सची कॉलनी पाण्यात

बसला आहे. सोमवारी (दि.१८) पडलेल्या पावसामुळे या कॉलनीच्या आवारात तीन ते चार फूट पाणी जमा झाले होते. त्यामुळे कॉलनीत पार्किंग केलेली वाहने बुडाली तर तळ मजल्यावर राहणाऱ्या अधिकारी वर्गाच्या कुटुंबीयांचे प्रचंड हाल झाल्याने त्यांना इतरत्र हलवावे लागले. शिवाय त्यांच्या सामानाचेही नुकसान झाले आहे. करोडो रुपये खर्चून बांधलेल्या प्रशस्त व दिमाखदार दिसणाऱ्या या कॉलनीची अवस्था पाहून सर्वत्र तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन (एनएमडी) प्रकल्पातील अधिकाऱ्यांसाठी नवीन वसाहत बांधतांना शेकडो एकर जागेवर करण्यात आलेला प्रचंड भराव, कॉलनीच्या मागील बाजूस पश्चिमेकडे मोठे डोंगर असल्याने या डोंगरातून पावसाळ्यात पाण्याचा मोठा लोंढा येणार असल्याचे माहित असूनही या मोठ्या पाण्याच्या प्रवाहाचा निचरा होण्यासाठी नियोजन न करणे, कॉलनीच्या जागेवर असलेल्या जंगलातील व ऑक्सिजन देणाऱ्या शेकडो झाडांची कॉलनी उभारताना केलेली कत्तल, आपला हक्काचा निवारा नाहीसा झाल्याने मोठ्या प्रमाणात विषारी साप बाहेर पडल्याने त्यांचा वाढलेला धोका, रिलायन्सच्या इतरत्र असलेल्या संपादित जागेवर कॉलनी न बांधता केवळ ही झाडाझुडपंनी व परिसराला ऑक्सिजनचा पुरवठा करणारी मोठमोठ्या वृक्षांनी भरलेली शेकडो एकर महत्वाची जागा विनाकारण सिमेंटच्या जंगलाने भरण्यात आली.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन (एनएमडी) प्रकल्पाचे विस्तारीकरण करण्यासाठी कंपनीच्या जुन्या निवासी संकुलातील मोठ्या प्रमाणातील जागेतील काही इमारती पाडून त्या जागेवर रिलायन्सचा प्रकल्प विस्तारित करण्याचे कंपनी व्यवस्थापनचे प्रयोजन आहे. त्यामध्ये राहणाऱ्या रिलायन्सच्या अधिकारी वर्गासाठी नव्याने कॉलनी बांधण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी जुन्या निवासी संकुलासमोर पश्चिम दिशेला असलेल्या आणि जागृत देवस्थान म्हणून परिसरात प्रचलित असलेल्या करकरणी मातेच्या डोंगराखालील बाजूस असलेली कंपनीच्या मालकीची शेकडो एकर जागा निवडण्यात आली.

याच जागेवर कॉलनी बांधण्याचे काम रिलायन्सने प्रसिद्ध अशा एल अँन्ड टी या मोठ्या कंपनीला दिले. डोंगराखालील जंगल व मोठमोठ्या वृक्षांचा परिसर असलेल्या या शेकडो एकर जागेवर एसी केबिनमध्ये बसून निसर्गाच्या विरोधात जाऊन कॉलनी बांधण्याचा आराखडा रिलायन्सच्या नावाजलेल्या व गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या अभियंत्यांनी तयार केला. मात्र नियोजित कॉलनीच्या जागेची भौगोलिक परिस्थित माहिती नसल्याने आणि स्थानिक नागरिकांकडून त्याविषयी जाणून घेण्याचे कष्टही रिलायन्स व एल.अँड.टी.च्या अभियंत्यांनी न घेतल्याने कॉलनीच्या कामात अनेक त्रुटी राहिल्याने कॉलनी परिसरात ३ ते ४ फूट पाणी तुंबल्याची परिस्थित निर्माण झाली. महाकाय डोंगराच्या पायथ्याशी ही कॉलनी बांधण्यात आल्याने यामध्ये राहणाऱ्या कुटुंबांना भविष्यातही धोका असल्याने जिल्हा आपत्कालीन यंत्रणेने याबाबतीत योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. यासंदर्भात रिलायन्स कंपनीचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

## कशेडीत कोसळली दरड

कंपनीने या डेंजर झोनमध्ये मोरीसाठी ब्लास्टींग केल्यानंतर साधारणपणे ९० ते १०५ मीटर लांब अंतराचा रस्ता १० फुटांपेक्षा अधिक खोल खचला. आतापर्यंत कोट्यवधी रुपयांची मलमपट्टी झालेल्या या रस्त्यावर मंगळवारी दरड कोसळली. या घटनेबाबत राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभाग व प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने भोगाव, कातळी बंगला पळचिल व गोलदरा या भागातील स्थानिक नागरिक आणि प्रवासी जनतेकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या दरडीमुळे नजिकच्या काळात मोठी दूर्घटना झाल्यास या परिसरातील २६ गाव व वाडी वस्तीतील जनतेचा धोकादायक मार्गावरून सुरू असणारा प्रवास जीवघेणा ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यंदा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पळचिल येथील माजी उपसरपंच उमेश मोरे यांनी बांधकाम प्रशासन व तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याशी संपर्क साधून विनंती केली असता तहसीलदार घोरपडे यांनी तात्काळ दखल घेऊन या रस्त्याची पाहणी केली. खचलेल्या भोगाव हद्दीतील रस्त्याची पाहणी करून संबंधितांना तात्काळ रस्ता दुरुस्तीचे आदेश दिले होते. नेहमीप्रमाणे या ठिकाणी तात्पुरती मलम पट्टी करण्यात येऊन या भेटीचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात झाला. मात्र, डेंजर झोनची धोकादायक परिस्थिती जैसे थे असल्याने जनतेतून नाराजी व्यक्त होत आहे.

## पुरात अडकलेल्या आदिवासींची सुटका

लोक बाहेर पडले, मात्र सुमारे २५ ते ३० नागरिक वाडीतच अडकले. रात्री पाण्याची पातळी झपाट्याने वाढू लागल्यामुळे पोलीस प्रशासनाने सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या घटनास्थळी पाचारण केले. रात्री साडेअकराच्या सुमारास बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिक, पोलीस प्रशासन व महसूल विभाग यांच्या मदतीने संयुक्तरीत्या बचावकार्य राबविण्यात आले. अडकलेल्या सर्व नागरिकांना बोटीच्या सहाय्याने सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या नागरिकांची व्यवस्था खांदाड प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्यात आली असून तेथे आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

## १५ पर्यटक सुखरूप

खोपोली पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज ठाकरे, पोलीस कर्मचारी अमोल धायगुडे, विकास पाटील आणि खोपोली फायर ब्रिगेडच्या टीमने मेहनत घेत सर्व पर्यटकांना वॉटर फॉल आणि पाण्याच्या प्रवाहातून बाहेर काढून परत पाठवले आहे. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये यांना १९ ऑगस्ट रोजी सुट्टी जाहीर करीत सतर्कतेचा इशारा दिला गेला होता. त्याकडे दुर्लक्ष करीत काही पर्यटक हे खोपोलीतील झेनिथ धबधब्यावर पाण्यात आनंद घेण्यासाठी अनेक आले असता १५ पर्यटक अडकून पडले. यातील ४ पर्यटक हे तमिळनाडू येथून मुंबई फिरायला आले होते. ते ४ पर्यटक सोशल मीडियावरिल रील्स बघून टॅक्सीने खोपोलीतील झेनिथ धबधब्यावर आले होते. त्याबरोबर उर्वरित ११ पर्यटक असे एकूण १५ पर्यटक हे झेनिथ धबधब्यावर अडकल्याची माहिती मिळताच खोपोली पोलीस, हेल्प फाउंडेशन व खोपोली फायर ब्रिगेड टीमने झेनिथ धबधब्यावर धाव घेत सर्व पर्यटकांना सुखरूप बाहेर काढले.

## सरकारच्या महालापेक्षा झोपडीच बरी

चौक ग्रामपंचायतने ४३ घर मालकांच्या डोक्यावर आभाळाएवढी घरपट्टी लादली आहे. त्यामुळे या ओझ्याने दरडग्रस्त पुन्हा मातीत गाडला जाणार असून तुमच्या महालापेक्षा आमची झोपडी बरी होती असं म्हणत सध्याची घर बंद करून नागरिक पुन्हा जुन्या इर्शाळवाडीत राहण्यास जाण्याच्या तयारीत आहेत.

इथला ग्रामस्थ विज बिल हजाराच्या घरात जात आहे. सिलेंडरसाठी महीना हजार रुपये, कडधान्य, तांदूळ, नाचणीसाठी ५ हजार, प्रवासासाठी खर्च अशा ओझ्याखाली दबला जात आहे. नवीन घरांसाठी ५ हजार रुपये घरपट्टी लादली आहे. ती कशी भरायची, रोजगार नाही, सर्वच विकतचे आणावे लागत असल्याने आर्थिक घडी पूर्ण विस्कटली आहे.जुन्या इर्शाळवाडीत ना लाईट बिल, जंगलातून जेवण शिजवण्यासाठी सरपण मिळत, ना घरपट्टी, शेत जमिनीतून भात, दळी वरकसमधून नाचणी, वरी मिळते तर मासेमारीत खेकडा चिंबोरी व परसबागेतून भाजीपाला मिळत असे. दुभदुभत्यासाठी गाई अशा आंनदी जीवनात नियतीने घात केला.

संसाराची राखरांगोळी झाली अन् जीवनाची परवड सुरू झाली. मात्र दुःखाचा डोंगर सारुन पुन्हा नव्याने संसार ऊभा केला जात असताना जीवनाची दशा थांबता थांबत नाही. पक्क्या घरातील खर्च भरुन जीव मेटाकुटीस आला आहे. शासनाने पक्क्या घरात आणले. मात्र आमचं घरटंच बरं होतं, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरु आहे. परिणामी, पावसाने उघड घेताच जुन्या इर्शाळवाडीचा रस्ता धरण्याच्या बेतात दरडग्रस्त ग्रामस्थ आहेत. दरडीखाली कुणाचे आई, वडील तर कुणाचे भाऊ, बहीण, आजोबा, आजी, मावशी, काका, काकू दबले गेले. नियतीने घात केला.

## पोलीस ठाणे पाण्यात

धक्कादायक बाब म्हणजे न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात पावसाचे पाणी शिरले असून, पोलिसांना पाण्यात उभे राहून कर्तव्य बजावण्याची वेळ आली आहे. यंदा दुसऱ्यांदा घडलेल्या या घटनेमुळे पोलीस ठाण्याच्या इमारतीची दयनीय अवस्था समोर आली आहे. जुनी इमारत, आजूबाजूला झालेल्या विकासकामांतील अतिरेकी भराव आणि निचऱ्याचे मार्ग बंद झाल्यामुळे संपूर्ण परिसर दलदल स्वरूपाचा झाला आहे. परिणामी पावसाचे पाणी ठाण्यात घुसत असून, कर्मचाऱ्यांची प्रचंड तारांबळ उडाली आहे. ठिकठिकाणी मोठमोठी झाडे पाण्यात उभी असल्याने ती कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे.

हे झाडे पडल्यास थेट जीवितास धोका संभवतो. पोलिसांसारखे २४ तास नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असणारे रक्षकच आज असुरक्षित झाले आहेत, हीच खरी शोकांतिका आहे. आपलं रक्षण करणारेच जर पाण्यात उभे असतील, तर प्रशासन कुठं आहे? हे पाहण्यासाठीही विशेष पथक लागणार आहे का? स्थानिकांकडून प्रशासनाला तातडीने लक्ष घालून न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचा परिसर सुरक्षित करण्याची जोरदार मागणी होत आहे.

## ट्रक कलंडल्याने वाहतूक ठप्प

**पोलादपूर :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर शहरालगत असलेल्या चोळई गावाजवळ चिपळूण बाजूकडून मुंबई दिशेने जाणारा कंटेनरवाहू १२ चाकी ट्रक रोडडिव्हायडरवर कलंडल्याने झालेल्या अपघातात भरपावसात वाहतुकीचा खोळंबा होऊन कशेडी घाटातील वाहतूक काही काळ ठप्प झाली.

कशेडी घाटातील चोळई गावाच्या तीव्र वळण उतारावरून अतिवेगाने १२ चाकी कंटेनरवाहू ट्रक चालवत उतरताना चालक सद्दाम महंमद माकोडा याचा ट्रकवरील ताबा सुटल्याने महाम ार्गावरील रोड डिव्हायडरवरील लोखंडी बॅरिकेटस तोडून पलटी झाला. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला. या अपघातामुळे महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प झाली. कंटेनरमधील सामान आणि कंटेनरचे अवशेष बाजूला केल्यानंतर दोन्ही बाजूने एकेरी वाहतूक सुरू करण्यात वाहतूक पोलिसांना यश आले आहे. चालकाच्या हलगर्जीपणामुळे झालेल्या या घटनेमुळे घाटामध्ये रखडलेल्या प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सोसावा लागला.

## कर्तबगार व्यक्तींचा सन्मान

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

अखिल श्री दशानेमा गुजराती वैष्णव (वणिक) समाज महाराष्ट्र, पुणे या संस्थेचा सन्मान सोहळा नुकताच संपन्न झाला. दशानेमा समाजात विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कर्तबगार व्यक्तींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या सन्मान सोहळ्यास राजस्थान, गुजरात, मुंबई तसेच मध्य प्रदेशमधील माळवा व महाकौशल यांच्यासह महाराष्ट्र कार्यकारिणीचे सभासद व बहुसंख्य ज्ञातीबांधव हजर होते.

या सन्मान सोहळ्यास प्रमुख पाहुणे किशोर धारिया व सुनीता शेठ हे होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम नेमा (जबलपूर) हे होते.

यावेळी सुधीर देसाई, अजय मेहता, निलेश धारिया, डॉ. श्रवण शेठ, चेतन धारिया, अनिता शेठ, अनिकेत गांधी, डॉ. सतीश देसाई, दिलीप गुजर, प्रणाली धारिया, आर्किटेक्ट आशिष बाळकृष्ण शेठ, डॉ. संदीप बुटाला, डॉ. चंद्रशेखर तलाठी, कॅप्टन संजीव दोशी, कांतीलाल शहा, सीए प्रोफेसर सुरेश मेहता, पराग शेठ, डॉ. प्रसन्न गांधी, अशोक तलाठी, सुरेश शेठ, अजिंक्य धारिया या सर्व कर्तबगार व्यक्तींचा सन्मान कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे किशोर धारिया व सुनीता शेठ व कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम नेमा यांचे हस्ते करण्यात आला.

कोरोना काळात ठाण्यातील सतीश शेठ यांनी डायमंड बिहाइंड कर्टेन असा मुलाखतींचा ऑनलाईन कार्यक्रम राबवला होता.

## निवडक



● सततच्या पावसामुळे हिराकोट तलावाशेजारील झाड उन्मळून पडले. छायाचित्र : समीर मालोदे

### माथेरानला पावसाने झोडपले



**माथेरान :** सलग चार दिवसांपासून माथेरानमध्ये वरुणराजा मनसोक्तपणे पर्जन्यवृष्टी करत असल्याने दि. १९ ऑगस्टपर्यंत हंगामी पर्जन्यमान एकूण ३८०९.२० मिमी. इतके झाले आहे. गेल्या वर्षी याच दिवशी, म्हणजेच १९ ऑगस्ट २०२४ रोजी एकूण पर्जन्यनोंद ही ४४७२.६० मिमी. इतकी होती. म्हणजेच, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षीचा हंगामी पर्जन्यमानाची तफावत ही तब्बल ६६३.४० मिमीने आजमितीस अजूनही कमी आहे. गेल्या वर्षी ३० सप्टेंबर रोजी एकूण हंगामी पर्जन्यमान ५९२७.० मिलिमीटर इतके झाले होते.आज दि.१९ रोजीच्या सकाळी साडेआठ वाजताच्या पर्जन्यमापन नोंदीनुसार, माथेरानला गेल्या २४ तासांत तब्बल २५४.६० मिलीमीटर इतकी पर्जन्यनोंद झाली. माथेरानला यावर्षीची २४ तासांतील सर्वोच्च पर्जन्यनोंद दिनांक १९ जून रोजी २६२ मिलीमीटर इतकी अगोदरच झाली आहे.



### पुरात अडकलेल्या वाहनांना केले रेस्क्यू

**नागोठणे :** नागोठण्यात अंबा नदीला सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी दुपार नंतर पुराचे पाणी भरले होते. त्यामुळे नागोठण्यातून महाड व पेण कडे जाण्यासाठी असलेल्या दोन्ही रस्त्यावर लेकव्ह्यू हॉटेल समोर व मरीआई मंदिर समोरील रस्त्यावर पुराचे पाणी आले होते. सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास लेकव्ह्यू हॉटेल समोरील रस्त्यावर याच पुराच्या पाण्यात अडकलेल्या दोन वाहनांना सुखरुप बाहेर काढण्याची कौतुकास्पद कामगिरी निसर्ग वन्य जीव संरक्षण संस्था रायगड अर्थात एन.व्ही.एस.एस.आर. टीमने केली आहे.

नागोठण्यातील लेकव्ह्यू हॉटेल समोरील रस्त्यावर अंबा नदीचे पुराचे पाणी भरले होते. तरीही पाण्यातून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात एक इको कार व स्विफ्ट कार पाण्यात अडकल्या होत्या. इको कारमध्ये एक पुरुष, एक गर्भवती महिला व लहान मुले होती तर स्विफ्ट कार मध्ये दोन पुरुष, एक महिला व दोन लहान मुले असलेले मुस्लिम कुटुंब होते. या दोन्ही कुटुंबाला एन.व्ही.एस.एस.आर. टीमकडून नागोठणे कोळीवाड्यातील तरुणांच्या सहकार्याने सुरक्षित बाहेर काढले.

### श्रीवर्धनमध्ये धुवाँधार पाऊस

**दिघी :** श्रीवर्धन तालुक्यात चार दिवस संततधार पावसाने लहान-मोठे रस्ते बंद पडत आहेत. मात्र, सोमवारी रात्रीपासून वादळी पावसाची जोरदार सुरुवात झाल्याने वेळास-आदगाव मार्गावर दरडी कोसळण्याची घटना घडली आहे. वादळी पावसामुळे दिघी ते आगरदांडा ही प्रवासी जलवाहतूक सेवा बंद करण्यात आली आहे. मुसळधार पावसामुळे बोर्लीपंचतन शहराला जोडणारे मार्ग पाण्याखाली येत असताना सोमवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. त्याचवेळी वेळास मार्गावर डोंगरावरील मोठा ओसरा दगडांसह खाली रस्त्यावर आल्याने रात्रीच्या अंधारात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली. पुढे अनुचित प्रकार घडू नये व वाहतुकीला अडथळा येऊ नये म्हणून महसूल मंडळाधिकारी सुनील पाटील तसेच दिघी सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी वेळेचे गांभीर्य ओळखून घटनास्थळी धाव घेतली. रात्रीच्या वेळी दगड हटवण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नसल्याने शेवटी अंधारात चाचपडत स्वतःच हाताने दगड हटवण्याचे काम प्रशासनाकडून करण्यात आले. वेळीच दखल घेतल्याने प्रवासी वर्गाला दिलासा मिळाला आहे.

# रायगडात पावसाचा हाहाकार

**मागील चार दिवसांपासून रायगड जिल्ह्यात तुफान पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. पावसाने हाहाकार उडविला असून, जिल्ह्यातील प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होऊन त्यांनी धोका पातळी गाठली आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पूरस्थितीमुळे अनेक शहरांमध्ये पाणी साचले असून, काहींच्या घरांमध्ये पाणी जाऊन पडझड झाली आहे. प्रमुख रस्ते पाण्याखाली गेल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला असून, जनजीवन ठप्प झाले आहे. भातशेती पाण्यात बुडाल्याचे चित्र दिसून येत आहे.**

**प्रमुख नद्यांना पुराची स्थिती**



## कुंडलिका, महिसदरा धोका पातळीवर

**। कोलाड । वार्ताहर ।**

सतत तीन दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसाने मंगळवार, दि.१९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून पुन्हा एकदा कुंडलिका व महिसदरा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणीच पाणी झाल्यामुळे या गावाकडे येण्या-जाण्याचा मार्ग बंद झाला असून, संपूर्ण भातशेती पाण्याखाली गेली आहे. प्रशासनातर्फे नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.



तुफान पावसामुळे महिसदरा नदीचे पाणी गोवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आल्यामुळे गोवे गावाकडे जाण्याचा मार्ग बंद झाला असून, सर्व भातशेती ही पाण्याखाली गेली आहे.तसेच तुफान पडलेल्या पुराचे पाणी गोवे येथील आदिवासीवाडी, बौद्धवाडी, तसेच रस्त्यावर असणाऱ्या दुकानात तसेच गावातील काही घरात पुराचे पाणी शिरूर मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे भातशेतीत पाणी शिरल्यामुळे भातशेतीचे ही नुकसान झाले आहे. पुराच्या पाण्यामुळे कामावर जाणारे कामगार, तसेच इतर नागरिक यांचीही तारांबळ उडाली आहे.

## धाटावमध्ये उद्योगांवर पाणीच पाणी

**। धाटाव । प्रतिनिधी ।**



सलग दोन दिवस बरसणाऱ्या पावसामुळे औद्योगिक क्षेत्रातील पावसाच्या पाण्याचा निचऱ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाच्या तयारीअभावी ठिकठिकाणी रस्त्यांवर पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याचे चित्र होते. सध्या पडत असलेल्या जोरदार पावसामुळे औद्योगिक वसाहतींमध्ये पाणी साचल्याच्या घटना घडत आहेत. विशेषत धाटाव औद्योगिक वसाहत आणि इतर काही ठिकाणी रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले आहे. यामुळे उद्योगांना आणि कामगारांना ये-जा करण्यासाठी तसेच व्यवसायात अडचणी येत आहेत. पावसाचे योग्य नियोजन नसल्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे. अनेक ठिकाणी नालेसफाई हवी तशी झाली नसल्याचे विदारक चित्र पाहावयास मिळाले, तर गटारे तुंबल्याने पाणी साचले आहे.

धाटाव औद्योगिक वसाहतीतील नीलिकॉन फूड डाइज कंपनीपासून एफ. डी.सी, नव्याने उभारलेली आयन एक्सचेंज, रोहा डाय केम, राठी डाय केम, बेक केमिकल यासह इतर कारखान्यातून पाणी साचल्याने रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. काही ठिकाणी कारची अर्धी चाके पाण्यात बुडत असल्याचे दिसून आले. औद्योगिक वसाहतीत अनेक ठिकाणी पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था फोल ठरल्याने रस्ते जलमय झाले.

औद्योगिक वसाहतील रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहनचालकांची, कामगार वर्गाची तारांबळ उडताना दिसली. परिसरातील वाहतूक कमालीची संथ होऊन काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली. खड्डे चुकवताना अवजड वाहनांची मोठी तारांबळ उडत होती.अनेक कारखान्यांच्या आवारातही रस्त्यावरील पाणी शिरल्याने उद्योजकांना मालवाहतूक करणे, कामगारांना कंपनीत जाणे, कंपनी आवारात वाहने उभी करणे अवघड झाले.

औद्योगिक वसाहती अंतर्गत रस्त्यांलगत विद्युत वाहक डिपी असल्याने साचलेल्या पाण्यामुळे शॉकलागण्याचीभीतीनिर्माणझाली होती. तर बहुतांशी कारखान्यांच्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील पाणी हे पुराच्या पाण्यात मिश्रित झाल्यामुळे वेगवेगळ्या रंगाचे पाणी औद्योगिक वसाहतीमध्ये पसरलेले पाहावयास मिळाले. गुडघाभर पाण्यातून वाट काढताना कामगारांना या दूषित पाण्याला सामोरे जावे लागले.

## म्हसळ्यात पावसाचे थैमान

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस पडण्याची नोंद म्हसळा तालुक्यात होत असते.दोन दिवसांत ३५८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तालुक्यात आतापर्यंत एकूण ४०९५ मि.मी. पाऊस पडला आहे. मागील चार दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असल्याने तालुक्यात नदी नाल्यांच्या पाण्याची पातळी वाढली आहे.



पांगलोळी गावातील सखल भागात पावसाचे व नदी खाडीचे पाणी साचले असल्याने जाण्या येण्याचा मार्ग बंद झाला होता. पांगलोळी गावातील रहिवासी मोहसीन अ.अझीझ धनसे यांच्या घराची पडवी कोसळून वित्त हानी झाली आहे, तर लेप गावी एका घरासमोरील संरक्षण भिंत कोसळली आहे. मरियम खार येथील सचिन दौलत पारावे यांच्या घराची मागील भिंत कोसळली आहे. म्हसळा शहरात इम्तियात दळवी यांच्या घरावर विजेचा पोल पडून घरातील वीज फिटिंगसह संपूर्ण इलेक्ट्रिक साहित्य जळून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. म्हसळा बायपास येथील ईदगा मैदानाची संरक्षण भिंतचे दोन ठिकाणी बांधकाम कोसळले आहे.

ढोरजे गाव मार्ग पुलावरून पाणी वाहत असल्याने येथील काही गावांचा येण्या जाण्याचा मार्ग बंद झाला होता. या मार्गावरून कोणी जाऊ नये अशी दवंडी पोलीस पाटील यांनी सोशल मीडियावर दिली होती. म्हसळा शहरातील दिघी रोड परिसर, तहसील कार्यालय येथे गुडघाभर पाणी साचल्याने लोकांना रहदारी करण्यासाठी मोठी कसरत करावी लागली.दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी श्रीवर्धन आगारातून बोर्लीमार्गे मुंबई, बोरिवली, नालासोपारा, पुणे येथे जाणाऱ्या एस.टी.गाड्या खुजारे येथील राज्य मार्गावर पाणी साचल्याने प्रवासी वाहतूक ठप्प पडली होती.

## धोकादायक पुलामुळे वाहतुकीत बदल

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

गेली दोन दिवस पावसाचा जोर कायम असल्याने मुंबई-गोवा महामार्गावर ठिकठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे माणगाव येथील कलमजेजवळील पुलावरून पाणी जात असल्याने तसेच गेली तीन-चार दिवस सततच्या पावसामुळे त्यावरून पाणी वाहून गेल्याने पुलाला काही थोडेसे तडे गेल्याची माहिती सदरील खात्याला मिळाली असून, मार्गावरील वाहतूक कोलाड आंबेवाडी नाका येथील भिरा फाट्यावरून ही माणगाव महाडकडे जाणारी वाहतूक वळविण्यात आली आहे.



मंगळवारी पहाटे धो धो मुसळधार पावसामुळे मार्गावरील माणगावनजीकच्या कलमजे गावाजवळील पूल पाण्याखाली गेल्याने मंगळवारी सकाळपासून माणगाव, महाड, पोलादपूर तसेच तळकोकणात जाणारी वाहतूक वाहतूक यंत्रणा तसेच स्थानिक पोलीस अधिकारी यांच्यावतीने ही कोलाड येथून भिरा फाटा सुतारवाडी, विले व जावठा, निजामपूरमार्गे माणगावकडे वळविण्यात आली आहे.

### भिसे खिंडीत झाड कोसळून वाहतूक ठप्प



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा-नागोठणे मार्गावर भिसे खिंडीत एक मोठे झाड रस्त्यावर कोसळले असून, मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. याची माहिती टीमला मिळताच, ही टीम त्वरित घटनास्थळी दाखल झाली. पावसाची तमा न बाळगता अतिशय मेहनत घेऊन या झाडाचे तुकडे करून हा बाजूला केला व वाहतूक सुरळीतपणे सुरु केली. सतत तीन-चार दिवसांपासून टीम विविध घटनास्थळी जाऊन मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या या कामगिरीचे कौतुक हो आहे.

## उरणमध्ये घरांची पडझड





**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्याला पावसाचा तडाखा बसला असून, रहिवाशांच्या घरांची पडझड झाली आहे. रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहन चालक बेजार झाले आहेत. झाडे उन्मळून पडली असून, जागतिक कीर्तीच्या जेएनपीए बंदराची व परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी नेहमी मेहनत घेणाऱ्या न्हावा शेवा पोलीस ठाण्याच्या इमारतीत पावसाचे पाणी शिरल्याची घटना घडली आहे. यामुळे पोलिसांना कामकाज करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

उरण तालुक्याला पावसाने झोडपून काढले असून, मागील तीन दिवसांपासून कोसळणाऱ्या पावसामुळे रानसई, मोठी जुई, पिरकोण, चाणजे, जासई, सारडे, कोप्रोली, चिरनेर या ग्रामपंचायत



हद्दीत रहिवाशांची कौलारू घरे पडल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत जीवितहानी झाली नसली तरी रहिवाशांचे आर्थिक नुकसान झाले असून, उरण महसूल विभागाच्या माध्यमातून या नुकसानीसंदर्भात पंचनामे करण्याचे काम सुरू असल्याची माहिती उरण तहसील कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे.

उरण जेएनपीए बंदराला जोडणारे नवी मुंबई, पनवेल शहराकडील रस्ते पाण्याखाली गेल्याने व झाडे उन्मळून पडल्याने वाहन चालक प्रवाशी नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे. अतिवृष्टीचा तडाखा उरण तालुक्याला बसत असताना आपत्कालीनव्यवस्थापनअधिकारी किंवा ठिकठिकाणचे ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी तसेच इतर शासकीय अधिकारी आपापल्या मुख्यालयाच्या ठिकाणी राहात नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त केली जात आहे.




### न्हावा शेवा पोलीस ठाण्यात शिरलं पाणी

**प्रशासनाकडून पंचनाम्यांचे काम सुरू** | **मुसळधार पावसाने संसार उघड्यावर**

## कर्जतमध्ये घरांच्या भिंती कोसळल्या

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात सलग दोन दिवस पावसाची संततधार सुरू आहे. मात्र, तरीदेखील कर्जत तालुक्यातील तिन्ही नद्या आणि नाले या धोक्याच्या पातळीवर जाऊन वाहात नाहीत. परंतु, या सततच्या पावसामुळे दोन शेतकऱ्यांच्या घराच्या भिंती कोसळल्याने त्या कुटुंबांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, कर्जत तालुका प्रशासनाने अद्याप कोणत्याही दरडग्रस्त कुटुंबाला स्थलांतरित केलेले नाही.

कर्जत तालुक्यात सलग दोन दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे तालुक्यातील बळीराजा भातशेतीवर पडलेल्या रोगराईपासून मुक्त झालेला दिसून येत आहे.दररोज साधारण दोनशे मिली पाऊस मागील दोन दिवस झाला असल्याने भाताची शेते दुथडी भरून वाहात आहेत. दुसरीकडे सततच्या पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहात असल्यातरी तालुक्यातील तीन प्रमुख नद्या या धोक्याच्या पातळीच्या खाली आहेत. उल्हास नदीचा कर्जत येथील बंधारा हा दोन मीटर खाली असून, उल्हास नदीवर असलेल्या कोणत्याही पुलावरून पाणी वाहात नाही. त्यामुळे संततधार पावसानंतरदेखील तालुक्यातील उल्हास, पोश्री आणि चिल्हार तसेच पेज या नद्या भरून



वाहात असून, नालेदेखील भरून वाहात आहेत. मात्र नद्या आणि नाले भरून वाहत असताना कोणत्याही ठिकाणी महापुराची स्थिती नसल्याने रस्त्यांवरील वाहतूक बंद होण्याच्या घटना घडलेल्या नाहीत.



कर्जत तालुक्यात दोन ठिकाणी शेतकऱ्यांच्या घराच्या भिंती कोसळून नुकसान झाले आहे. सावेळे येथील मंगेश सोनवणे यांचे घराची भिंत कोसळली असून, कोणतीही जीवितहानी झालेली नाही, मात्र महसूल खात्याने तात्काळ पंचनामा करून नुकसानी माहिती महसूल विभागाला दिली आहे. तर तलाठी सजा गौरकामत बारणे येथील भाऊ नागो मोडक यांच्या घराची रात्री ११ ते १२ सुमारास भिंत कोसळून अंशतः नुकसान झाले.

### एक घर कोसळले

**कर्जत तालुक्यात रात्री दोन घरांच्या भिंती कोसळल्या होत्या. त्यात भर पडली असून, तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायतीमधील आशाणे ठाकूरवाडीमधील एका आदिवासी कुटुंबाचे घर पावसामुळे कोसळले आहे. येथील रामा गोमा खडके याचे घर कोसळले असून, या कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.**

## खालापुरातील धरणे ओव्हर फ्लो



**। खालापुर । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील धरणे ओव्हर फ्लो, नदी नाले ओसंडून वाहू लागली आहेत. सतत पडणाऱ्या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतीचे नुकसान मोठ्या प्रमाणावर दिसत आहे. शेतीने तळ्याचे रूप धारण केले आहे. खालापूर तालुक्यात भिलवले, कलोते, डोनवत आणि खरसुंडी वळण बंधारा आहे, ही धरणे पाटबंधारे विभाग यांची आहेत. ही धरणे तुडुंब भरल्याने वाहत आहेत.तसेच गावागावांतील तलाव, विहिरी पूर्णपणे भरली आहेत.गेले काही दिवस मुसळधार पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले असून रसायनीतील मोहोपाडा, रिस, वावेघर, सिध्देश्वरी बाजारात भाजीपाला आणण्यास अथवा विकण्यास जाणे सुद्धा कठीण झाले आहे. पाऊस थांबायचे नाव घेत नाही, तर आणखी जोरदार सुरू झाला आहे. पाताळगंगा नदी दुथडी भरुन वाहत असून रात्रभर पाऊस झाल्यास नदीला पूर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# याचिका दाखल करा

आपल्या लोकशाहीची सर्व मदार निवडणूक यंत्रणेवर आहे. ही यंत्रणा निःपक्षपाती आहे याच भरवशावर मतदार मतदान करीत असतात. आणीबाणीच्या काळात सर्व सरकारी यंत्रणा इंदिरा गांधी सरकारच्या अंकित झाल्या होत्या. तरीही १९७७ मध्ये पुन्हा निवडणुका जाहीर झाल्या व त्या खुलेपणाने पार पडल्या. इंदिराजी सत्तेत असूनही काही करू शकल्या नाहीत. विरोधी नेते नुकतेच तुरुंगातून सुटून आले होते. त्यावेळी सोशल मिडिया किंवा आजच्यासारख्या टीव्ही वाहिन्या नव्हत्या. तरीही जनतेनेच ती निवडणूक लढवली व जिंकली. आज देशात अधिकृतपणे आणीबाणी लागू नाही. पण निवडणूक आयोगासकट सर्व यंत्रणा मोदी व भाजप सरकारसाठी काम करतात असे सतत दिसत असते. हरियाणाच्या पानिपत जिल्ह्यातील एका गावातील सरपंचपदाच्या निवडणुकीत हेच दिसले. तीन वर्षांपूर्वी तेथे भलत्यालाच विजयी घोषित करण्यात आले. त्याला पराभूत उमेदवाराने आव्हान दिले. त्याचा फैसला अलिकडेच सर्वोच्च न्यायालयात झाला. या निवडणुकीला पराभूताने तात्काळ आव्हान दिलेले असल्याने मतदानयंत्रे सुरक्षित ठेवण्यात आली होती. न्यायालयामध्ये त्या यंत्रांमधील मते पुन्हा मोजण्यात आली. त्यावेळी पराभूत घोषित झालेल्या उमेदवाराला विजयी उमेदवारापेक्षा ५१ मते जास्त असल्याचे दिसून आले. एका बूथवर मला असलेली मते विरुद्ध उमेदवाराला दिली गेली असा पराभूत उमेदवाराचा दावा होता. तो योग्य असल्याचे सिध्द झाले. मतदानयंत्रांमधील मोजणी ही खरे तर कॅलक्युलेटरप्रमाणे होते. त्याच्यात मानवी हस्तक्षेपाला वा चुकीला काही वाव असण्याचा प्रश्न नसतो. तरीही ५१ मतांची फिरवाफिरव करण्याचा प्रकार झाला. याचाच अर्थ निवडणूक आयोग कितीही दावे करीत असला तरी ही यंत्रणा निर्दोष नाही. उद्या याच रीतीने मतदानयंत्रांमध्येही भानगडी असल्याचे सिध्द झाले तर आश्चर्य वाटणार नाही. राहुल गांधी यांनी अलिकडेच या भानगडींचे काही पुरावे दिले. त्यांची चौकशी न करताच राहुल यांना खोटे आणि देशद्रोही ठरवण्याची घाई चालू आहे. यात निवडणूक आयोगही भाजपच्या बाजूने उतरला आहे. हरियाणातील ही मतचोरी कशी झाली, संबंधितांवर काय कारवाई होणार, असेच आणखी काही प्रकार इतरत्र झाले असतील का याविषयी आयोगाने खुलासा करायला हवा.

## मारकडवाडीची आठवण

या निमित्ताने मारकडवाडीची आठवण येणे साहजिक आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीनंतर सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडीचे प्रकरण गाजले होते. या गावातील मते विरोधकांना मिळूच शकत नाहीत असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांचे म्हणणे होते. मारकडवाडीच्या गावकऱ्यांनीही तेव्हा उचल खाल्ली व इव्हीएमऐवजी मतपत्रिका किंवा बॅलट पेपर टाकून मतदान घेण्याची तयारी त्यांनी केली. पण फडणवीस सरकारने गावकऱ्यांना खटले भरण्याच्या व तुरुंगात टाकण्याच्या धमक्या दिल्या. असे मतदान घेणे म्हणजे निवडणूक प्रक्रियाच अमान्य करणे ठरेल व तो देशद्रोह ठरेल असे सुचवले जाऊ लागले. विरोधकांनीही गावकऱ्यांना म्हणावा असा पाठिंबा दिला नाही. त्यामुळे मतपत्रिकांद्वारे मतदानाची सर्व तयारी करूनही आयत्या वेळी ते रद्द करण्यात आले. मारकडवाडी किंवा तत्सम प्रकरणे ज्या गावांमध्ये वा विभागांमध्ये घडतील त्यांना आता हरियाणातील या प्रकरणाने वाट दाखवली आहे. कोणत्याही निवडणुकीला न्यायालयातच आव्हान द्यावे लागते. शिवाय विशिष्ट मुदतीत अर्ज दाखल करावा लागतो. या प्रक्रियेत वेळ लागू शकतो. हरियाणाच्या निवडणुकीचा निकाल जवळपास तीन वर्षांनी फिरवण्यात आला आहे. तसेच इतरत्र घडू शकते. मात्र असे शेकडो खटले जर उद्या न्यायालयात दाखल होऊ लागले तर सर्व यंत्रणांचे काय होणार हा प्रश्न आहे. यासाठी निवडणूक आयोगाने तक्रारींची दखल घेणे व नागरिकांचे समाधान होईपर्यंत खुलासा करणे आवश्यक आहे. इव्हीएम यंत्राविषयी आजही अनेकांना शंका आहेत. अशा वेळी खरे तर ज्या ठिकाणी अशी शंका येईल तिथे इव्हीएमची मोजणी पुन्हा करू द्यायला हवी. सुरुवातील कदाचित अशी खूप प्रकरणे हाताळावी लागतील. आयोगाच्या यंत्रणेवर ताण येईल. पण त्यामुळे शंकांचे निरसन तरी नक्की होईल. प्रत्यक्षात अशा तक्रारी आल्यानंतर आजपर्यंत आयोगाचे धोरण लपवाछपवी व दडपादडपीचेच राहिलेले आहे.

## आयोग काय लपवत आहे?

गेल्या विधानसभा निवडणुकांनंतर विरोधी पक्षांनी ठिकठिकाणी मतदान फेरमोजणीसाठी अर्ज करण्याचे ठरवले. पण त्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, फेरमोजणी म्हणजे प्रत्यक्ष निवडणुकीतील मतांची पुन्हा मोजणी होणार नसून मतदानयंत्राची केवळ चाचणी करून दाखवली जाणार आहे. मतदारयंत्रात निवडणुकीत जी मते नोंदवली गेला तो डेटा त्यातून पुसून टाकून यंत्रे साफ केली जातील व नव्याने चाचणी मते टाकून यंत्रांमध्ये भाजपला टाकलेली मते भाजपला व राष्ट्रवादीची राष्ट्रवादीलाच जात आहेत हे सिद्ध करण्यात येईल. विरोधकांना अर्थातच हे मान्य झाले नाही. प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी जी यंत्रे वापरली जातात त्यांमध्ये आणि मतदान होत असताना काहीतरी घोटाळा केला जातो असा विरोधकांचा वहीम आहे. तो दूर करायचा असेल तर आधीचीच मते त्याच यंत्रांमध्ये पुन्हा मोजली पाहिजेत. निदान विरोधक मागणी करतील अशा निवडक पाच व दहा ठिकाणी हे करण्यास काहीच हरकत नाही. पण मतदानयंत्रांचा डेटा तर पुसला जातोच, शिवाय, मतदानकेंद्रातील सीसीटीव्ही फुटेजही ४५ दिवसात नष्ट करण्याचा नियम घाईघाईने करण्यात आला. लोकांचा विश्वास वाढवण्याऐवजी त्यांच्या शंका वाढतील असेच हे सर्व वर्तन आहे. बिहारचे उदाहरण सर्वात अलिकडचे आहे. तेथे मतदारयाद्यांचे फेरपरीक्षण करण्याची मोहीम हाती घेण्यात आली. पण ती गुपचूप एका सरकारी आदेशाद्वारे जाहीर झाली. कोणाही राजकीय पक्षाला त्याची कल्पना नव्हती किंवा त्यांच्याशी याबाबत चर्चाही केलेली नव्हती. आता फेरपरीक्षणानंतरची पहिली यादी जाहीर झाली असून त्यातून ६५ लाख नावे वगळण्यात आली आहे. आधी कोणाची नावे वगळली आहेत हे जाहीर करायलाच आयोग तयार नव्हता. मग सर्वोच्च न्यायालयाने बडगा उगारला. आता वगळलेली नावे व ती का वगळली याची कारणे काल सोमवारी प्रसिद्ध करण्यात आली. आता राजकीय पक्षांना यात काहीतरी कृती करता येईल. फेरपरीक्षण करताना आधारकार्डाच्या मुद्द्यावरून असाच घोळ घालण्यात आला. आधारकार्ड हा पुरावा म्हणून मान्य करणार नाही अशी भूमिका आयोगाने घेतली. पण न्यायालयाने आता आधारला मान्यता द्यायला त्यांना भाग पाडले आहे. दरम्यान, राहुल गांधी व तेजस्वी यादव यांच्या मतदार अधिकार यात्रेला रविवारपासून सुरुवात झाली असून त्याला सर्वत्र प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत लोकांमध्ये किती नाराजी आहे हे कळून यावे. आता ग्यानेशकुमार यांच्याविरुध्द महाभियोग दाखल करण्याच्या हालचाली विरोधकांनी सुरू केल्या आहेत. ते एक ठीक. मात्र त्यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध एक स्वतंत्र याचिका दाखल करायला हवी.

## विचार

# ‘ईडी’ची सर्वोच्च कानउघडणी

***गेल्या काही दिवसांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने ‘ईडी’वर ताशेरे ओढले. या तपास यंत्रणांना हाताशी धरून सत्ताधारी आपले ईप्सित साध्य करण्याचा प्रयत्न करतात; परंतु या प्रकरणात तपास यंत्रणांची विश्वासार्हता कमी होते. सर्वोच्च न्यायालयाने तपास यंत्रणांवर बोट ठेवताना त्यांना समज दिली; परंतु त्यातून त्या बोध घेणार का, पिंजऱ्यातला पोपट होण्यात धन्यता मानणार का, याची उत्तरे येणाऱ्या काळात मिळतील.***



**शिवाजी कराळे**

अलिकडेच सर्वोच्च न्यायालयाने ‘ईडी’ला गुंडासारखे वागू नका, अशी समज दिली. पूर्वीही एका प्रकरणात न्यायालयाने ईडी आणि सीबीआयला फटकारले होते. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, खटला लांबवून आरोपीला अमर्यादित काळ तुरुंगात ठेवता येणार नाही. तपासात विलंब होण्यापासून आरोपपत्र दाखल करण्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही तपास यंत्रणांना चांगलेच सुनावले होते. छत्तीसगडच्या बहुचर्चित दारू घोटाळ्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कामकाजावर कडक टिप्पणी केली. अरविंद सिंहच्या जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती अभय एस. ओका म्हणाले की ‘ईडी’ पुरेशा पुराव्याशिवायच आरोप करते, ही आजकालची एक पद्धत बनली आहे. आरोपीचा कंपनीशी थेट संबंध सिद्ध होत नसताना ४० कोटी रुपयांच्या बेकायदेशीर कमाईचा दावा कोणत्या आधारावर केला जात आहे? आम्ही अनेक प्रकरणांमध्ये पाहिले आहे की तुम्ही फक्त आरोप करता; परंतु कोणतेही पुरावे देत नाही. महिनोनमहिने तपास सुरू ठेवून पुरवणी दोषारोपपत्रे दाखल करत जायचे आणि जामीन मिळवण्याच्या संशयितांच्या अधिकारांची पायमल्ली करायची, हे अजिबात चालणार नाही. ठरलेल्या मुदतीत तपास पूर्ण होत नसेल, तर तो पूर्ण होईपर्यंत अटकच करू नका. आरोपींना जामिनावर सोडले, तर ते साक्षीदारांवर दबाव आणतील, पुरावे नष्ट करतील असे सरकारी वकिलांनी म्हटले तेव्हा असे घडले तर जामीन रद्द करण्यासाठी न्यायालयात येण्याची सुविधा तपास यंत्रणेला उपलब्ध आहे, असे न्यायालयाने निदर्शनास आणले. या ताज्या चर्चेनिमित्त एका जुन्या विषयाला नव्याने तोंड फुटले.

‘ईडी’ या केंद्रीय तपास यंत्रणेची कामाची पद्धत, विशेषत: ‘मनी लाँड्रिंग’ प्रकरणांमधील तपास भल्याभल्यांच्या अंगावर काटा आणणारा आहे. साधारणत: ‘ईडी’चे पथक छापा टाकते, संबंधितांना चौकशीसाठी बोलावते, तासनतास बसवून ठेवते. काहीजण उशिरा ‘ईडी’ कार्यालयातून बाहेर पडल्याचे, तर बहुतेकांना रात्री उशिरा कधी तरी अटक करण्यात आल्याचे अनेक प्रकरणांमध्ये देशाने पाहिले आहे. ‘मनी लाँड्रिंग’ कायद्यातील काही कलमे अत्यंत जाचक आहेत. त्यामुळे जामीन मिळणे सोपे राहत नाही. त्यातच विरोधी पक्षांच्या नेत्यांनाच या ना त्या निमित्ताने या कायद्याखाली अडकवण्यात आल्याचा आणि त्यापैकी काहीजण नंतर सत्ताधारी पक्षात गेले, की प्रकरणे थंड्या बस्त्यात टाकल्याचा आरोप सतत होत आला आहे. या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी महत्त्वाची आहे. फौजदारी दंडसंहितेनुसार गंभीर प्रकरणामध्ये संशयितांच्या अटकेनंतर तपास पूर्ण करून ९० दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करणे तपास यंत्रणेवर बंधनकारक आहे. अन्यथा, आरोपी जामीन मिळण्यास पात्र ठरतात. ‘ईडी’ने मात्र अत्यंत हुशारीने या नियमातून पळवाट शोधली. ‘डिफॉल्ट बेल’ची मुदत संपण्याच्या आत जुजबी दोषारोपपत्र दाखल करून तपास सुरू असल्याचे सांगायचे, नंतर ठराविक कालावधीनंतर एकापेक्षा अनेक पुरवणी दोषारोपपत्रे दाखल करत जायचे आणि त्याच वेळी तपास पूर्ण झाला नसल्याचे सांगत संशयितांच्या जामीन अर्जाला विरोध करत रहायचा, अशा आशयाच्या या पळवाटेवर नेमके बोट ठेवून सर्वोच्च न्यायालयाने ‘ईडी’च्या चलाखीवर ताशेरे ओढले आहेत.

या पार्श्वभूमीवर ‘ईडी’च्या फेऱ्यात अडकलेल्या अनेक नेत्यांचा जामीनावर बाहेर येण्याचा मार्ग आता मोकळा होऊ शकेल. आर्थिक गुन्ह्यांची प्रकरणे तपासासाठी किचकट असतात हे खरे. त्यामुळे त्यांचा तपास तीन महिन्यांमध्ये पूर्ण होईलच असे नाही. तथापि, तपासाच्या सुरुवातीलाच संशयितांना अटक करण्याऐवजी तपास आटोक्यात आल्यानंतरच अटकेचा विचार करता येऊ शकतो. पुरवणी दोषारोपपत्रांना पायबंद बसला तर त्या पुरवण्यांमधून हव्या त्या आरोपींची नावे वगळण्याचा, हवी त्यांची नावे वाढवण्याचा प्रकारही कमी होईल. सर्वोच्च न्यायालयाने ईडीच्या कार्यवाहीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. ‘ईडी’ने हरयाणाचे माजी आमदार सुरेंद्र पवार यांची रात्री उशिरापर्यंत चौकशी केली. ही चौकशी सुमारे १५ तास आणि मध्यरात्रीनंतर चालली. न्यायालयाने याला अतिरेकी आणि अमानवी वर्तन म्हटले आहे. ‘ईडी’ने बेकायदेशीर खाणकामाशी संबंधित ‘मनी लाँड्रिंग’ प्रकरणात पवार यांना अटक केली होती; परंतु पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने अटक रद्द केली. उच्च न्यायालयाच्या निर्णयाला ‘ईडी’ने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने ‘ईडी’चे अपील फेटाळले आणि उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. न्यायालयाने ईडीच्या काम करण्याच्या पद्धतीवर चिंता व्यक्त केली. मानवी हक्क लक्षात घेऊन चौकशी करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. कलम २१ अंतर्गत दिलेल्या आदेशानुसार ‘ईडी’ भविष्यात अशा प्रकरणांमध्ये एखाद्या दिवशी इतका वेळ अनावश्यक छळ करण्याऐवजी, संयुक्त राष्ट्रांनी घालून दिलेल्या मूलभूत मानवी हक्कांनुसार आरोपींच्या निष्पक्ष चौकशीसाठी काही आवश्यक व्यवस्था स्थापित करेल, अशी अपेक्षाही न्यायालयाने व्यक्त केली आहे. सलग १५-१६ तास चौकशी हे ‘ईडी’ अधिकाऱ्यांनी केलेले अमानुष वर्तन असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. हे प्रकरण दहशतवादी कारवायांशी संबंधित नसून बेकायदेशीर वाळू उत्खननाचा खटला आहे आणि अशा प्रकरणात लोकांशी असे वागले जाऊ नये, असे न्यायालयाने म्हटले. आमदार पवार यांची सुरुवातीची अटक तसेच अटकेचे कारण कायद्याने टिकाऊ नव्हते आणि ‘ईडी’कडे श्री. पवार यांना गुन्हेगारीतून मिळालेल्या रकमेशी संबंधित कोणत्याही प्रक्रियेत किंवा कृतीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असल्याचे सिद्ध करणारे कोणतेही पुरावे नव्हते. हरयाणा, छत्तीसगड, कर्नाटक, दिल्ली तसेच अन्य ठिकाणच्या प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने ‘ईडी’, ‘सीबीआय’सह अन्य तपास यंत्रणांवर ओढलेले ताशेरे आणि त्याबाबत केलेल्या टिप्पण्या या मौखिक असतात. त्यात आदेश नसतो. त्यामुळे तपास यंत्रणा त्या गांभीर्याने घेत नाहीत. औपचारिक लिखित आदेशांनाच महत्त्व मिळते. न्यायालयाची मौखिक अथवा अनौपचारिक मते अथवा टिप्पणी यांना कुठल्याही प्रकारे कायदेशीर महत्त्व प्राप्त होत नाही. अनेक पक्ष, अभ्यासक, विश्लेषकांना न्यायालयीन निकालांवर आपले मौखिक मत मांडण्याचे अभिव्यक्तीस्वातंत्र्य आहे, त्याचप्रमाणे अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे न्यायाधीशांचे अधिकार वगळता येणारे नाहीत. राज्यघटनेतील परिशिष्ट तीनअंतर्गत न्यायाधीशांच्या शपथेमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा ते त्याग करतील, असा कुठलाच उल्लेख नाही. न्यायाधीशांची मौखिक अथवा अनौपचारिक टिप्पणी, मते कायदेशीर तत्त्वांमध्ये ग्राह्य धरता येणारी नसल्याने नक्कीच असंवैधानिक ठरत नाहीत. थोडक्यात, न्यायदानाच्या प्रत्यक्ष प्रक्रियेत अशी तोंडी ताकीद, इशारे, ताशेरे हे सारेच नगण्य ठरते. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांचे युक्तिवाद फेटाळले असले, तरी मौखिक ताशेऱ्यांचा ‘ईडी’च्या कार्यपद्धतीवर काही परिणाम झाला का, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. सर्वोच्च न्यायालय वारंवार थपडा लगावत असूनही अंमलबजावणी संचालनालया(ईडी)चा कारभार सुधारायला तयार नाही. न्यायालयाचे ताशेरे अनेकदा तोंडी असल्याने त्याचे गांभीर्य यंत्रणेच्या लक्षात येत नसावे. पिंजऱ्यातल्या पोपटापासून सुरू झालेला तपास यंत्रणांचा प्रवास आता सत्ताधारी पक्षाने ‘छू’ म्हटले, तर धावून जाणाऱ्या कुत्र्यापर्यंत झाला आहे. सामान्यांच्या अधिकारांचा संकोच करण्याबरोबरच त्यांच्या मनात अकारण भीती निर्माण करण्याचे काम ‘ईडी’सारख्या यंत्रणेने केले असून तपास यंत्रणांवरचा विश्वास उडत असेल, तर ती चांगली गोष्ट नाही.

## चर्चा आजची

# मानवावर पावसारूपी निसर्गाचा कहर



**संतोष राऊळ**

गेल्या दोन दिवसांपासून रायगड जिल्ह्याला मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील अनेक नद्यांना पुराचे स्वरूप आले असून अनेक घरांत, बाजारपेठांत पाणी शिरले. त्यामुळे सर्वसामान्यांना प्रचंड प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. त्यातच गणेशोत्सव अवघ्या काहीच दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाप्पाच्या आगमनाच्या तयारीवर देखील पावसाने पाणी फेरले आहे. काही ठिकाणी तयार झालेल्या मुर्त्या देखील भिजल्या आहेत. विविध डेकोरेशन आणि इतर गोष्टींनी भरलेल्या बाजारपेठा देखील या पावसात बळी पडल्या आहेत. त्यामुळे व्यावसायिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यातच जे काही शिल्लक राहिलेले रस्ते होते ते देखील दिसेनासे झाले आहेत. पावसाच्या या थैमानामुळे बळीराजा देखील चिंतेत पडला आहे. राब जाळण्यापासून ते भात लावणीपर्यंत प्रचंड प्रमाणात त्याने पावसाचा खेळ सहन केला. कसे बसे पीक वाढवले आणि पुन्हा पावसाने उभं पीक आडवं करण्याची सुरूवात केली आहे. तसेच, डोंगराळ भागात दरड कोसळण्याच्या घटना देखील प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. त्यात बळी देखील गेले आहेत. त्यामुळे मानवावर पावसारूपी निसर्गाचा कहर बरसत असल्याची चर्चा जाणकरांकडून होत आहे.

पाऊस हा नैसर्गिक आहे. मानवाने निसर्गाशी केलेल्या छेडछाडीमुळे त्याचे गणित देखील बदलले आहे. चार महिने पडणारा पाऊस हल्ली बारा महिन्यात कधीही कोसळतो. मानवाने नद्यांना बांध घातले. नद्या व खारफुटी जमिनी भराव टाकून बुंजवल्या. डोंगर पोखरले, प्रचंड प्रमाणात वृक्षतोड केली. अत्यंत घातक असे विषारी वायू हवेत सोडले, नद्या प्रदुषित केल्या. त्यामुळे या सर्वचा बदला जणू निसर्गच पावसारूपी बरसून घेत असल्याचे जाणकारांकडून बोलले जात आहे. यावर खबरदारी म्हणून आपण स्वतःहून पुढाकार घेऊन यावर तोडगा काढणे गरजेचे आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आपण पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्यांना सामोरे जात आहोत. दरवेळी संकटं वाढत आहेत. परंतु, त्यावर तोडगा काढण्यासाठी कोणीही पुढे सरसावत नाही. याउलट सत्ताधाऱ्यांकडून आर्थिक फायद्यासाठी कोणताही विचार न करता मोठंमोठे प्रकल्प आणले जात आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना रोजगार तर मिळतोच परंतु त्यात नैसर्गिक हानी किती होते, याचा विचार ते करत नाहीत. असे प्रकल्प आले कि त्या ठिकाणी लोकसंख्या देखील वाढत जाते. त्यांना राहण्यासाठी घरांची संख्या वाढते. जागा अपूरी पडली की झाडांची कत्तल केली जाते. डोंगरांवर देखील घरे बांधली जातात. वाहनांची संख्या वाढत चालली आहे. रस्ते रूंदीसाठी डोंगरी फोडले जात आहेत. त्यामुळे दरड कोसळण्याचे प्रमाणही प्रचंड वाढले आहे. तसेच, पाण्यासह वायू प्रदुषणात वाढ होत आहे. या सर्वचा परिणाम पावसाच्या चक्रावर होत आहे. त्यामुळे पाऊस कधीही आणि कसाही बरसत आहे.

मुंबईसारख्या शहरात पावसाळ्यातील परिस्थिती सर्वात बिकट असते. यंदाच्या पावसाळ्यात मुंबई वाहून जातेय की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. सिमेंटच्या वाढत्या जंगलामुळे तसेच प्लास्टिक सारख्या कचऱ्यामुळे नद्या, नाले बुंजत चालले आहेत. परिणामी मुंबईची तुंबापुरी झाली आहे. २० वर्षांपूर्वी पावसाळ्यात मुंबईचे जे हाल होते ते आजही तसेच आहेत. मुंबईची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस सुधारत आहे; परंतु, आवश्यक असलेल्या गोष्टींमध्ये मुंबई मागे पडत चालली आहे. मुंबईच्या रस्त्याला अक्षरशः नदी, तलावांचे स्वरूप आले आहे. त्या रस्त्यांखालून विजेसह गॅस लाईनसारख्या अनेक लाईन गेल्या आहेत. भर पाण्यात ती लाईन ब्रेक झाली तर त्याचे भयंकर परिणाम भोगावे लागतील. या समस्या मुंबईसह महाराष्ट्रभर भेडसावत आहेत. या समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहे. विद्यमान सरकार सध्या बघ्याची भूमीका घेताना दिसत असल्याचे सर्वसामान्यांकडून बोलले जात आहे.

दरवर्षी अशी परिस्थिती असुनही विद्यमान आमदार, खासदार याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. मुंबई सारख्या शहरात अशी परिस्थिती असेल तर ग्रामीण भागातील परिस्थिती विचार करण्यापलिकडची असेल. येथील रस्ते तर पावसामुळे आणि पावसाच्या पाण्यात गायब झाले आहेत. सर्वसामान्यांना जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सत्ताधिकारी महागड्या आरामदायी गाडीतून फिरत आहेत. त्यामुळे त्यांच्यापर्यंत पावसाचा कहर कसा पोहोचेल? त्यांचे भोग देखील सर्वसामान्यांनाच भोगावे लागत असल्याचे सर्वसामान्यांकडून बोलले जात आहे.

## लोकसंसद

# सीएनजी गॅस व इलेक्ट्रिक चार्जिंगवर वाहने चालवणाऱ्यांची सोय करा

सीएनजी गॅसवर तसेच इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या गाड्या हा प्रदूषण निवारण्यासाठी चांगला पर्याय आहे. सरकारही सीएनजी गॅसवर चालणाऱ्या तसेच इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वाहनांचा पुरस्कार करत नागरिकांनी सीएनजी गॅसवर चालणारे तसेच इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी करावी असे आव्हान करत आहे. सरकारच्या आव्हानाला प्रतिसाद देत नागरिकही आता सीएनजी गॅसवर चालणारे तसेच इलेक्ट्रिकवर चालणारे वाहन खरेदी करीत आहेत पण अनेक ठिकाणी सीएनजी गॅस विविध जागी पेट्रोल पंपावर बऱ्याचदा उपलब्ध नसतो. असलाच तर प्रेशर नसतो, त्यामुळे मर्यादित आउटलेटवरून तो भरला जात असल्याने तेथे वाहनांच्या रांगा लागतात.



इलेक्ट्रिक चार्जिंगवरील वाहनांसाठी बॅटरी संपली की चार्ज करण्यासाठी चार्जिंग स्टेशन अत्यंत तुटपुंजी आहेत. ग्रामीण भागात तर ती जवळपास नाहीतच. या साऱ्याचा फटका पुन्हा वाहन धारकांना व प्रवाशांनाच बसतो. ज्यांनी सीएनजी गॅसवर चालणारे वाहन तसेच इलेक्ट्रिक वाहन खरेदी केली आहेत त्यांना याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महाशक्ती बनायला चाललेल्या देशात लोकांना असे तासंतास जिकडे तिकडे रांगा लावायला लावून त्यांचा बहुमोल वेळ वाया घालवणे योग्य आहे का? याचा विचार सरकारने करावा. वास्तविक सीएनजी गॅसवर चालणारे तसेच एकेक्ट्रिकवर चालणारे वाहन हा प्रदूषण मुक्तीचा चांगला मार्ग आहे. मात्र तो प्रशस्त आणि सुखकारक नसल्याने नागरिक पुन्हा पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या वाहनांकडे वळू शकतात तसे झाले तर प्रदूषणमुक्त भारत हे सरकारचे स्वप्न स्वप्नच राहील तसे होऊ द्यायचे नसेल तर सरकारने शहरांसह ग्रामीण भागातही सीएनजी गॅस सर्व पेट्रोल पंपावर उपलब्ध करून द्यावा तसेच ठराविक अंतरावर चार्जिंग स्टेशन्स उभारावीत. जर सीएनजी गॅस आणि चार्जिंग स्टेशन उपलब्ध करून दिली तरच नागरिक डिझेल पेट्रोल वरील वाहनांपासून दूर राहतील आणि प्रदूषण निवारण्याचा सरकारचा प्रयत्न यशस्वी होईल.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## दिनविशेष

# भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या म हिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते.

राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या.

स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० ऑगस्ट

१) श्रीम.हर्षदा यशवंत करंजावकर
अलिबाग, २०-०८-१९४८
२) श्रीम. विमल केरू शिंदे
ब्राम्हणआळी, अलिबाग
२०-०८-१९४५
३)श्री.दिपक भास्कर पवार
जुने मार्केट अलिबाग, २०-०८-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**स्व. प्रकाश हरिश्‍चंद्र पाटील, स्मरणार्थ अलिबाग**



**श्री. प्रताप गंभीर, स्मरणार्थ अलिबाग**

**तन्वी अभिजीत शेट्ये, वाढदिवस अलिबाग**

## सुवर्णकण



समाजातील कमकुवत आणि खुळी माणसे बैरागी लोकांच्या चमत्काराच्या मागे लागून आणि खऱ्या परमार्थाची, आत्मज्ञान प्राप्तीसाठीची कास न धरल्यामुळे स्वतःचे अपरिमित नुकसान करून घेतात.

**श्रीज्ञानेश्‍वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**



# पन्नास जणांची 'इस्त्रो'साठी निवड

**। पुणे । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या शाळेतील पंचवीस विद्यार्थ्यांना 'नासा'ला जाण्याची संधी मिळाली. ५० विद्यार्थी हे 'इस्त्रो'च्या भेटीसाठी जाणार आहेत. आंतरविद्यापीठ खगोलशास्त्र व खगोल भौतिकशास्त्र केंद्राकडून (आयुका) जिल्हा परिषदेला निकाल पाठवला आहे. त्यामध्ये शिरूर आणि खेड तालुक्यातील प्रत्येकी चार विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.यासाठी तीन टप्प्यांत चाचणी परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी एक लेखी परीक्षा आणि दु-सरी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. दुसऱ्या ऑनलाइन परीक्षेमधून १३ टक्के विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आयुकामध्ये २३५ विद्यार्थ्यांच्या मुलाखतीझाल्या. त्यामधून अंतिम यादी तयार करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी आयुका या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला होता. नासाला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे सिद्धी मंजिरे, रुद्र मोरडे, भास्कर तावरे, सोहम टेंभरे, अदिती राऊत, अदिती पारथे, स्पृहा खेडेकर, आयुष शेलार, शंतनू कदम, श्रावणी मगर, मोहम्मद उमर शेख, साईराज पवार, वेदिका गुजर आदीची निवड करण्यात आली आहे.

# मुंबईत पावसाचा कहर

## ●हार्बर मार्गावरील लोकल सेवा बंद ● मिठी नदीने ओलांडली इशारा पातळी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**सलग दुसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवारीही मुंबई आणि परिसरात पावसाचा जोर कायम असल्याने लोकल सेवा विस्कळीत झाली आहे. मध्य रेल्वेवर मंगळवारी दुपारी सीएसएमटी आणि ठाणे स्टेशन दरम्यानची लोकल सेवा बंद करण्यात आली असून हार्बर रेल्वेवरही वाशीहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लोकल गाड्या बंद आहेत. तर पश्‍चिम रेल्वेवरील वाहतूक १० ते १५ मिनिटे उशिराने सुरू होती.**



मुंबई शहर व उपनगरात गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या जोरदार पावसाने मंगळवारी अक्षरशः कहर केला. मंगळवारी पहाटे मुंबईत १८५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. मुंबईतील मिठी नदीने इशारा पातळी ओलांडली असून कुर्ला पुलाजवळील क्रांती नगरमध्ये एनडीआरएफची टीम दाखल झाली आहे. नागरिकांना स्थलांतर होण्याचे आवाहन केले आहे.

दुसरीकडे मुंबईची लाईफलाईन अर्थात लोकल सेवेलाही या पावसाचा फटका बसला आहे. मुंबई परिसरात मुसळधार पाऊस आणि रुळावर पाणी साचल्यामुळे सीएसएमटी आणि ठाणे स्थानकादरम्यानची मुख्य रेल्वे सेवा पुढील सूचना मिळेपर्यंत बंद करण्यात आल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

ठाणे-कर्जत, खोपोली आणि कसारा स्थानकादरम्यान शटल सेवा सुरू असल्याचंही रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. पश्‍चिम रेल्वेवर चर्चगेट ते डहाणू रोड या मार्गावरील रेल्वेसेवा सुमारे १० ते १५ मिनिटे उशिराने धावत आहे. लोकल सेवा विलंबाने धावत असल्या तरी कार्यालयांना सुटी जाहीर झाल्याने लोकल ट्रेनमध्ये फारशी गर्दी नव्हती. तर दुपारी दोनच्या सुमारास विरार ते वसई दरम्यान सकल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रेल्वे वाहतूक मंदावली आहे. हार्बर रेल्वेवरी सीएसएमटी ते कुर्ला या मार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. चुनाभट्टी येथे रेल्वे रुळावर पावसाचे पाणी साचल्याने वाहतूक पुढील सुचनेपर्यंत बंद करण्यात आली आहे. दरम्यान, काम असेल तरच घरा बाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### रेल्वे वाहतूक कोणत्या स्थानकांपर्यंत सुरू आहे?

हार्बर मार्गावर पनवेल- वाशी या स्टेशनदरम्यान, ट्रान्सहार्बर मार्गावर ठाणे- वाशी आणि मध्य रेल्वेवरील ठाणे- कल्याण- कसारा तसेच ठाणे- कल्याण- कर्जत या स्टेशनदरम्यानची वाहतूक सुरू आहे. तसेच सीएसएमटी - गोरेगाव - सीएसएमटी हार्बर लाईन सेवा दुपारी दोनच्या सुमारास पूर्ववत करण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालय तसेच सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर झाल्याने तिन्ही मार्गावरील प्रवाशांची संख्या कमी आहे.

### अनेक सुपरफास्ट एक्सप्रेस रद्द

मध्य रेल्वेच्या रिशेड्युल झालेल्या लांबपल्ल्याच्या एक्सप्रेस गाड्या११०११ - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते धुळे एक्सप्रेस रद्द १२०७१-जनशताब्दी एक्सप्रेस -छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते हिंगोली रद्द२२१५९- छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस - एम. जी.आर. चेन्नई सेंट्रल सुपरफास्ट एक्सप्रेस रद्द १२१८८-छत्रपति शिवाजी महाराज टर्मिनस - जबलपुर गरीब रथ एक्सप्रेस रद्द करण्यात आल्या आहेत.



# पुराच्या पाण्याने शेती पाण्याखाली

**। नेवाळी । प्रतिनिधी ।**

सोमवारपासून मुसळधार पावसाची संततधार सुरु आहे. मंगळवारी मलंगगडच्या नदीने रौद्ररूप धारण केल्यानंतर शेतकरी चिंतेत पडला आहे. नदीच्या पाण्याने आजूबाजूच्या परिसरातील भात शेतात प्रवेश केल्याने पीक पुराच्या पाण्यात वाहून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

परिसरात यंदा लक्षणीय भात पिकाची लागवड झाली आहे. मात्र, लागवड झाल्यानंतर आता सुरु झालेल्या मुसळधार पावसाने शेतकरी हवालदिल झाला आहे. सोमवारपासून कोसळणाऱ्या धो-धो पावसाच्या धारांनी परिसरात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.

नद्या, नाल्यांची देखील रौदय रूप धारण केलेलं असताना आता त्यामधील पाणी थेट भात शेतात प्रवेश करू लागला आहे. अंबरनाथ तालुक्यातील ढोके गावाच्या हद्दीत असलेल्या भात शेतात पुराच्या पाण्याने प्रवेश केला आहे. सह्याद्रीच्या डोंगराळ भागात पावसाची संततधार सुरूच असल्याने नदीच्या पाणी पातळीत देखील वाढ होत आहे. त्यामुळे पावसाची संततधार अशीच सुरु राहिल्यास लागवड केलेली भात पीक पुराच्या पाण्यात वाहून जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

# आंबा घाटात दरड कोसळून वाहतूक ठप्प

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्‍वर तालुक्यातील रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गावरील आंबा घाटातील दख्खन जवळ सोमवार (दि.१८) पुन्हा दरड कोसळून वाहतूक ठप्प झाली. दोन्ही बाजूंनी पाच यंत्रांच्या सहाय्याने दरड बाजूला करण्याचे काम सुरु आहे. गेले चार पाच दिवस जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. सर्व नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. काही ठिकाणी पुरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.



रत्नागिरी-कोल्हापूर महामार्गाच्या रुंदीकरणासाठी सध्या काम सुरु आहे. कटाई करण्यात आलेल्या डोंगरामुळे राहिलेल्या डोंगराचा भाग सतत कोसळत असल्याने वाहतूकदार धास्तावले आहेत. त्यातच वाहतूक कोंडी होत आहे. हे काम करत असताना ठेकेदारांनी मात्र योग्य ती काळजी न घेतल्यामुळे त्याचा फटका वाहनचालकांना बसत आहे. रविवारी तसेच सोमवारी आंबा घाटात काही ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडल्या. रविवारी यामुळे वाहतूक संथ झाली होती. काही ठिकाणी एकेरी वाहतूक सुरु होती. सोमवारी सकाळी दख्खन जवळ भलीमोठी दरड कोसळल्याने वाहतूक संपूर्ण ठप्प झाली आहे. सततच्या पावसामुळे दरड बाजूला हटविण्यास अडथळा येत आहे. तहसीलदार व पोलीस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून दरड बाजूला करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे.

# भाज्या एपीएमसीत स्वस्त, किरकोळला महाग

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**



मुंबई एपीएमसी घाऊक भाजीपाला बाजारात आज सोमवारी ६५१ गाड्यांची आवक झाली. मात्र मुसळधार पावसाचा फटका शेतमालाच्या विक्रीला बसला. सोमवारी ६० गाडी भाजीपाला व्यापार्यांच्या गाळ्यात पडून राहिला आणि बाजारभाव २५ टक्यांनी घसरले असे असले तरी किरकोळ बाजारात मात्र सर्वच भाज्यांचे दर सरासरी १२० रुपये किलो होते. रविवारी रात्रीपासून सुरु झालेल्या पावसाचा सोमवारी दिवसभर जोर कायम होता. रात्री आठ वाजल्यापासून पहाटेपर्यंत ६५१ गाड्यांची आवक झाली. त्यामुळे सरासरी ४५० गाड्यांची आवक झाल्याचे घाऊक व्यापाऱ्यांनी सांगितले. मुसळधार पावसात पहाटेच्या पहिल्या सत्रात खरेदीदारांनी भाजीपाला खरेदी केला. मात्र, पावसाचा जोर वाढल्याने ग्राहकांची संख्या कमी झाली. यामुळे सुमारे ६० गाडी शेतमाल शिल्लक राहिला. पावसामुळे बाजार भावावरही परिणाम झाला असून २५ टक्के दर पडले. मात्र किरकोळ बाजारात भाजीपाल्याचे दर चढेच होते. घाऊकला टोमॅटो उत्तम प्रतीचा ४० रुपये तर इतर सरासरी २० ते ३० रुपये किलो होता. किरकोळला ८० रुपये किलो, इतर भाजीपाला हा सरासरी ३० ते ४० रुपये पाव म्हणजेच १२० ते १६० रुपये किलो एवढा होता.

# 'रेड अलर्ट' मुळे चिपळुणात प्रशासन सतर्क

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्याला दोन दिवसांसाठी 'रेड अलर्ट' दिला गेल्याने चिपळुणातील आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत प्रशासन सतर्क झाले आहे. गेले काही दिवस चिपळूण शहर परिसरात पावसाने चांगलाच जोर धरला आहे. परिणामी, शिव आणि वाशिष्ठी नद्या दुथडी भरून प्रवाहित होत आहेत; मात्र प्रशासनाच्या सतर्कतेमुळे शहरात पूर येण्याचा धोका टळला आहे. मागील ४८ तासांत चिपळूण शहर परिसरासह नऊ मंडल विभागामध्ये सर्वात



जास्त पावसाची नोंद शहराच्या पूर्व भागात सह्याद्री पट्ट्यातील कळकवणे येथे ३०० मि. मी. झाली. त्यामुळे रेड अलर्टच्या पार्श्‍वभूमीवर प्रशासन सतर्क झाले आहे. चिपळुणातील प्रशासन दोन दिवसांच्या रेड अलर्टच्या पार्श्‍वभूमीवर सतर्क झाले असून मागील सुमारे ४८ तासांमध्ये चिपळूण शहरासहीत नऊ मंडल विभागात पडलेल्या पावसाच्या आकडेवारीमुळे प्रशासनाकडून योग्य नियोजन केले गेले आहे. मागील दोन-तीन दिवसांत चिपळूण शहर परिसरात सुमारे ३४८ मि. मी. पावसाची नोंद झाली तर शहरानजिकच्या खेर्डी परिसरात ३४३ मि. मी. पावसाची नोंद झाली. सर्वाधिक जास्त पूर्व पट्ट्यात दोन दिवसांत ३९० मि. मी. पाऊस झाला तर शिरगाव मंडलात ३६० मि. मी. पावसाची नोंद झाली. शहराच्या दक्षिण व पश्चिम भागातील नऊ मंडलांमध्ये सावर्डे परिसरात अनुक्रमे १९८ मि.मी. व ११४ मि. मी., असुर्डे १७८ व १२३ मि. मी., वहाळ परिसरात १४० व १२० मि. मी., रामपूर मंडळ परिसरात १२२ व ११५ मि. मी., मार्गताम्हानेत १०८ व ११० मि. मी. अशी नोंद करण्यात आली.

दोन दिवसांच्या रेड अलर्टमध्ये सतर्क झालेल्या प्रशासनाने पावसाचा जोर लक्षात घेता शहरात पूर परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी नियोजन सुरू केले आहे. दरम्यान, मागील ४८ तासांत झालेल्या पावसामुळे शहरातील काही ठिकाणच्या सखल भागात पावसाचे पाणी तुंबले होते. वाशिष्ठी व शिव नदीपात्रापेक्षा कमी उंचीवर असलेल्या या भागातील पाणयाचा निचरा थांबला होता.



# आगरी साहित्य संमेलन उत्साहात

**। नेवाळी । प्रतिनिधी ।**

मराठीतील बोली भाषांचे जतन व्हावे यासाठी आगरी ग्रंथालय चळवळीच्या वतीने तिसरे आगरी साहित्य संमेलन श्री मलंगगडाच्या पायथ्याशी आयोजित करण्यात आले होते. या साहित्य संमेलनात मुळ आगरी भाषेत प्रवचन, कवी संमेलन, श्री मलंग जागरण परिसंवाद, पारंपरिक फेऱ्यांची गीत आयोजित करण्यात आली होती.

आगरी ग्रंथालय चळवळ आणि समाज कल्याण न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे पावसाळी आगरी साहित्य संमेलन 'सरावन सरी' आयोजित करण्यात आला होता.

मुंबईसह ठाणे, रायगड, पालघर आणि नाशिक जिल्ह्यातील आगरी कोळी साहित्यिक, लोककलाकार श्रावण महिन्यात एकत्र येऊन आगरी बोलीभाषा जतन करण्याचे काम करतात. मराठीतील आगरी बोली भाषेचा प्रचार करणे तसेच आगर भूमिची संस्कृती जोपासण्याच्या उद्देशाने 'सरावन सरी' आगरी साहित्य संमेलन आयोजित केले जाते. आगरी ग्रंथालय चळवळ आणि समाजकल्याण न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी आगरी संमेलन आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये साहित्य, गायन, अभिनय, वैद्यक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांसह कलाप्रेमी तसेच राजकीय क्षेत्रातील समाज बांधवांची उपस्थित मोठी होती.

जगन्नाथ पाटील यांच्या आगरी बोलीतील प्रवचनाने श्रोत्यांची मने जिंकली. यामध्ये प्रामुख्याने त्यांनी आगरी समाजातील सुरु असलेल्या विविध परंपरा तसेच मराठीतील आगरी भाषेचे असलेल्या उपस्थितांना माहिती दिली आहे. तसेच संतांच्या साहित्यात देखील आगरी भाषेचा उल्लेख असल्याचे त्यांनी सांगितले. आगरी साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने आगरी कवी एकवटले होते. आगरी कवी संमेलनाच्या अध्यक्ष सुनिल पाटील होते. तर संमेलनाचे सूत्रसंचलन निर्मला पाटील यांनी केले.

# राजपुरीत स्मशानभूमी जवळचा रस्ता खचला

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड राजपुरी येथील हिंदू स्मशानभूमीच्या काही अंतरावर तर माझेरी रस्त्यानजीक वळणावर रस्ता खचला आहे. या ठिकाणी रस्त्यांवरुन जाताना वाहनचालकांना हा रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक ठरू नये यासाठी आगरदांडा येथील सचिन मयेकर, दिनेश डोंगरीकर यांनी ज्या ठिकाणी रस्ता खचला आहे ठिकाणी दगड लावून सावधानतेचा इशारा दिला आहे.



या मार्गावरून सावकाश वाहने हाकण्याचे आवाहन केले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्गत या ठिकाणी सूचना फलक व रस्त्याच्या बाजूला सुरक्षेच्या दृष्टीने व्यवस्था केली पाहिजे अशी मागणी केली जात आहे.

# पुणे शहरात संततधार घाटमाथ्यावर अतिमुसळधार

**। पुणे । वृत्तसंस्था।**

राज्यात सर्वत्र जोरदार पाऊस सुरू असताना पुणे जिल्हा, शहर, पिंपरी चिंचवडसह घाटमाथ्यावर गत २४ ते ४८ तासात संततधार ते अति मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी सुखावला आहे. काही भागात पूर तर काही भागात भिजपावसाने दाणादाण उडवून दिली आहे. सोमवारी रात्री पुन्हा पावसाला सुरुवात झाली तो पाऊस मंगळवारी दुपारी एक वाजता काहीवेळ थांबला. सकाळी दहा वाजेपर्यंत शहरात सरासरी ५० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. दोन दिवसात पावसाची सरासरी ताम्हिणी ३२०- लोणावळा १८९- शिरगाव २१०- वाळवण १०२- आंबोने १९६- भिवपुरी ८१- दावडी २५५- डोंगरवाडी २७१- कोयना १५१- पोफळी २१५- खंद ६२- धारावी २३५, शहरात सकाळी नऊ वाजेपर्यंत पाऊस झाल्याची नोंद आहे.

## नोकरदार वर्गाचे, शालेय विद्यार्थ्यांचे हाल | एसटीच्या काही फेऱ्या रद्द

# ठाण्यात सर्वत्र पाणीच पाणी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

सलग दोन दिवस झालेल्या दमदार पावसामुळे तसेच सोमवारी सकाळपासूनच पावसाचे हजेरी लावल्यामुळे ठाणे शहरात अनेक ठिकाणी पाणी तुंबले. त्यामुळे सकाळी कामाला जाणाऱ्या नोकरदार वर्गाचे, तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल झाले. विशेष म्हणजे साचलेल्या पाण्याचा सर्वाधिक फटका घोडबंदर महामार्गाला बसला. या महामार्गावर ठीकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे तसेच पाणी साचल्यामुळे दोन्ही मार्गावरची वाहतूक अक्षरशः विस्कळीत झाली होती. गेले काही दिवस दडी मारुन बसलेल्या पावसाने शनिवारी ठाणे शहरात हजेरी लावली. हवामान खात्याने १५ ते २० ऑगस्ट दरम्यान ठाणे जिल्ह्यात पाऊस पडणार, असा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार, शनिवारी सकाळपासून ठाणे शहरात



पावसाने दमदार हजेरी लावली. त्यानंतर रविवारीही पावसाचा जोर कायम होता. तर सोमवारी सकाळपासून ठाण्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्याचे दिसून आले. शहरातील राम मारुती रोड, वंदना सिनेमा, ठाण्यातील बाजारपेठेत देखील गुडघाभर पाणी साचले होते. घोडबंदर भागातील गायमुख परिसरात असलेल्या डोंगरातून पावसाचे पाणी खाली रस्त्यावर आले, तर या पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे ते पाणी रस्त्यात साचले होते. त्यामुळे येथील वाहतुक सुरळीत करण्यासाठी वाहतुक पोलिसांची दमछाक सुरु असल्याचे चित्र दिसून आले. त्यात येथील मार्गावर खड्यांचे प्रमाण वाढल्याने आणि त्यात पाणी साचत असल्याने त्याचाही परिणाम वाहतुकीवर झाल्याचे दिसून आले. ठाणे ते कासारवडवली हे अंतर कापण्यासाठी अर्धा तासाचा अवधी लागतो. मात्र, पावसामुळे याठिकाणी दिड तासाचा कालावधी जात होता. विटावा पुलाखाली देखील पाणी साचल्याने वाहतुक धिम्या गतीने सुरु होते.

या पावसामुळे या नोकरदारवर्गाचे चांगलेच हाल झाले. त्यांना नोकरीच्या ठिकाणी पोहोचण्यास विलंब झाला. भाजी विक्रेते तसेच इतर फेरीवाले विक्रेते यांची देखील या पावसामुळे दैना उडल्याचे दिसून आले. तसेच शहरातील इतर सखल भागातही पावसाचे पाणी साचल्याचे दिसून आले. सकाळपासून काहीसा हलक्या पावसाच्या सरी बरसत होत्या. दुपारी १२.३० वाजता १६.२६ मीमी पावसाची नोंद झाली. मात्र त्यानंतर पावसाचा जोर वाढला आणि दुपारी २.३० वाजता २७.४४ मीमी पावसाची नोंद झाली. तर दुपारी ४.३० पर्यंत १०० मीमी पेक्षाही अधिकची नोंद शहरात झाली.

पावसामुळे एसटी वाहतूक संथशहर आणि जिल्ह्यात कोसळलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्यातील एसटीची वाहतूक मंदावली होती. मात्र, वाहतूककोंडीमुळे भाईंदर मार्गावरील एसटीच्या काही फेऱ्या रद्द कराव्या लागल्या.

### शाळकरी मुलांना बोटीचा सहारा

दुपारच्या सत्रातील शाळांना सुट्टी देण्यात आली. तर सकाळच्या सत्रातील शाळांमधील मुले शाळेतच होती. अशातच वाढलेल्या पावसाचा फटका कळव्यातील शाळकरी मुलांना देखील बसल्याचे दिसून आले. न्यू शिवाजी नगर येथील शाळेबाहेर पाणी साचल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. परिस्थिती गंभीर होताच स्थानिकांच्या मदतीने शाळकरी मुलांना छोट्या बोटीतून सुरक्षित स्थळी हलविण्यात आले व अखेरीस पालकांच्या स्वाधीन करण्यात आल्यानंतर सुटकेचा श्वास सोडण्यात आला.

# आपत्कालीन मदत यंत्रणा अलर्ट मोडवर

## महापालिकेची नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन; पाणी साठणाऱ्या भागावरती लक्ष केंद्रीत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात सोमवारी पहाटेपासूनच मुसळधार पाऊसास सुरूवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन अलर्ट मोडवर आहे. पाणी साठणाऱ्या भागावरती अधिक लक्ष केंद्रीत केले आहे. तसेच सर्व यंत्रणेला सुसज्ज व सतर्क राहण्याचे आदेश तर नागरिकांनी स्वत:ची काळजी घ्यावी असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या दोन दिवसापासून जोरदार पर्जन्यवृष्टी होत आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागाने १९ ऑगस्ट रोजी रायगड जिल्ह्याला 'रेड अलर्ट' दिला असून मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.**



### नागरिकांनी काळजी घ्यावी

मुसळधार पाऊसात नागरिकांनी धोकादायक इमारतीमध्ये आसरा घेऊनये तसेच झाडे होर्डिंग्ज खाली उभारू नये असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. नागरिकांची सुरक्षितता व काळजी घेण्यासाठी महापालिका तत्पर असून कोणत्याही परिस्थितीत नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. महापालिकेच्या सर्व विभागांनी आयुक्तांच्या निर्देशानुसार आपापसात योग्य समन्वय ठेवून अलर्ट मोडफवर काम करावे, योग्य नियोजन करून उपाययोजना कराव्यात, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त व उपायुक्तांनी महापालिकेच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जोरदार पडणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना चोवीस तास सतर्कता बाळगण्याच्या व परिस्थितीची पहाणी करण्यासाठीच्या सूचना दिल्या आहेत.

दरम्यान पनवेलमधील बांठिया शाळेजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साठले असून आयुक्त मंगेश चितळे व परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी याठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहाणी केली. याच बरोबर कळंबोलीमध्येही प्रत्यक्ष जाऊन पहाणी केली. तर उपायुक्त रवीकिरण घोडके, प्रभारी अधिक्षक रोशन माळी यांनी प्रभाग क्रमांक १७ पनवेलमध्ये नदी काठची पाहणी केली.

कळंबोलीमधील २० ठिकाणी कोठेही पाणी साठणार याची काळजी महापालिकेच्यावतीने घेण्यात येत आहे. उपायुक्त रवीकिरण घोडके, अभिषेक पराडकर, सुबोध ठाणेकर व प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली पनवेल शहरातील कोळीवाडा भारत नगर झोपडपट्टी, पटेल मोहल्ल्यामधील ८० नागरिकांना कोळीवाडा शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे. कोळीवाड्यातील १०५ नागरिकांना उर्दु प्राथमिक शाळा येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

> स्थलांतरितांना पालिकेकडून चहा, जेवण, आरोग्य सेवा व पाण्याची सोय पनवेल महानगरपालिकातर्फे करण्यात येणार आहे. तसेच वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने मदत सुरु करण्यात आली आहे. हवामान खात्याने मंगळवारी देखील रायगड जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी महापालिकेच्यावतीने सर्व तयारी करण्यात आली आहे.
> – कैलास गावडे, उपायुक्त आपत्ती व्यवस्थापन विभाग

## आमली पदार्थ विरोधात जनजागृती अभियान

**पनवेल :** आमली पदार्थ विरोधात खांदेश्वर पोलीस जनजागृती अभियान करीत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अंमली पदार्थामुळे मानवी शरीरावर होणारे परिणाम म्हणजे स्मरणशक्तीचा ऱ्हास होणे, नविन गोष्टी शिकण्याची क्षमता कमी होते, ग्रहणशक्ती कमी होते, विचारशक्ती कमी होते, असंबध्दता निर्माण होते, चिंता व भय, मुत्रपिंड खराब होते, हृदयविकाराचा झटका, छातीत दुखणे, आकडी येणे, सभ्रमावस्था होणे, मानसिक आजार, अंमली पदार्थ मिळाले नाही तर बेचैन होणे असे प्रकार होतात. जो कोणी आपला मित्र अथवा मैत्रीन अचानक एकांती राहु लागला त्याच्या हाता पायावर इंजेक्शन खुणा दिसल्या, स्वभाव अचानक चिडचिडा झाला, पैसे उधार मागु लागला, वर्गामध्ये गैरहजर राहु लागला, उलटया करून आचके देऊ लागला असे निर्दर्शनास आल्यास आपले वर्गशिक्षक अथवा खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये कळवा आपले मित्र, शिक्षक ,पालक व खांदेश्वर पोलीस स्टेशनमध्ये कळवा असे आवाहन करण्यात आले आहे.

# किरण बाथम यांचे निधन

**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**



पत्रकारितेची सुरुवात मुरुड सारख्या ग्रामीण भागातून करून आपल्या कार्यक्षमतेच्या जोरावर पत्रकारिता क्षेत्रात नाव कमावलेले किरण बाथम यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी निधन झाले. अत्यंत हुशार व बुद्धिवान व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष त्याच प्रमाणे त्यांनी मुरुड तालुका पत्रकार संघाची स्थापना करून त्यांनी मुरुड तालुका पत्रकार संघाचे सलग दहा वर्ष अध्यक्षपद भूषविले होते. सर्वांना सहकार्य करण्याची वृत्ती त्यामुळे त्यांची जनमानसात त्यांची उत्तम प्रतिमा होती. पनवेल येथील एम. जी. एम हॉस्पिटल येथे त्यांची प्राणज्योत मालवली आहे.



मुरूड परिसरात समुद्र खचल्याने व वादळी वारे वाहत असल्याने सर्व मच्छिमार बोटी दिघी खाडीत विसावल्या आहेत. मासेमारीच्या पहिल्या हंगामात झालेल्या नुकसानी कोळी बांधव हताश झाले आहेत. (छायाचित्र :सुधीर नाझरे)

# विनोद पाटील यांनी स्वखर्चाने भरले रस्त्यांवरील खड्डे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्रीगणेशाचा उत्सवाला आठ दिवसांनी सुरुवात होणार आहे. पावसामुळे अनेक रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे रोज छोटे-मोठे अपघात होत आहेत. प्रशासनाने, प्राधान्याने खड्ड्यांची दुरुस्तीचे काम हाती घेणे गरजेचे असताना सुद्धा त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यावर्षी सुद्धा गणरायाच्या आगमण व विसर्जन मार्गात खड्ड्यांचे विघ्न कायम असणार असल्याचे चित्र दिसत आहे.



प्रशासन रस्त्यांची कामे करणार नाहीत, फक्त नागरिकांना भूलथापा दिल्या जातात, त्यांच्या कडून कामाची अपेक्षा राहिलेली नाही असा नागरिकांचा सूर आहे. प्रशासनाने खड्डे भरण्याची वाट न पाहता, शेतकरी कामगार पक्षाचे खंडाळा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विनोद पाटील यांनी स्व-खर्चाने अलिबाग पेण मुख्य रस्त्यावरील वाडगाव फाटा ते पिंपळभाटपर्यंतचे अपघातग्रस्त खड्डे जेसीबीच्या सहाय्याने खडी व माती टाकून भरले आहेत.

यावेळी त्यांच्या समवेत मनोहर पाटील, साहिल पाटील, निखिल पाटील व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रवासी संघटनेतर्फे पनवेल आगाराला फुलझाडे

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील केळवणे ते पनवेल येथे नोकरी व रोजगारानिमित्त नियमित प्रवास करणाऱ्या ग्रामीण भागातील प्रवाशांमार्फत पनवेल एसटी आगाराच्या सुशोभीकरणासाठी, ग्रामीण प्रवासी संघटनेच्या अध्यक्षा जयवंती गोंधळी यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच ५० 'शो'ची फुलझाडे देण्यात आली.

यावेळी पनवेल आगाराचे वाहतूक नियंत्रक श्री म्हात्रे, सतीश नलावडे, पूजा खेडेकर, एस आर राठोड, जी. एम. गायकवाड, ए. ए. ढेरे, जी .पी. सकपाळ, अर्जुन ढेरे, अर्जुन बनसोडे जयवंती गोंधळी, आशीर्वाद पाटील, प्रतिभा पाटील, रचना म्हात्रे, रूपाली गावंड, हर्षदा घरत, अंजली भोईर, प्रभाकर भोईर, मनस्वी गिरवाडकर, अंकिता ठाकूर, श्वेता कडू, कामिनी गायकवाड, राजश्री पाटील, मयुरी ठाकूर, पूनम म्हात्रे, शुभम पाटील, सिद्धी घरत, नमिता म्हात्रे, तेजस जोशी, स्नेहा जाधव, अरुणा तांडेल, मेघा ठाकूर, शोभा पाटील, समता पाटील, गीतांजली पाटील, किसन ठाकूर, अदिती पाटील, दयाराम म्हात्रे, स्वानंद नवाळे, नाना पाटील, सानिका चौलकर, तसेच अन्य प्रवासी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक मंडळास सन्मानपत्र

**। उरण । प्रतिनिधी ।**

लोकहितासाठी यशस्वी व प्रेरणादायी कार्याचा गौरव म्हणून उरण तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांनी ज्येष्ठ नागरिक मंडळमुळेखंड, तेलीपाडा, कोळीवाडा, कुंभारवाडा, व परिसर यांना स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट २५ रोजी सन्मानित करून सन्मान पत्र देण्यात आले. सन २०२४ -२५ या कालावधीत सामाजिक, सांस्कृतीक व आरोग्य विषयक, क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट, कार्याबद्दल, महिला-पुरुष मैत्री मेळावे, प्रतिभावंत विद्यार्थांचा सन्मान, स्वच्छता अभियान, ज्येष्ठ नागरिक वाढदिवस साजरे करणे, आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर, तसेच धार्मिक व संसृतिक सहली या उपक्रमामुळे समाजहिताची अमुल्य सेवा केली आहे. समाजसेवेची प्रेरणा इतरांना मिळावी याची दखल घेऊन उरण तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी तालुका उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी सन्मान पत्र देवून सन्मानित केले.

यावेळी नायब तहसिलदार नरेश पेढ़वी, निवासी नायब तहसिलदार महेश पाटील, नायब तहसिलदार रविंद्र सानप, नायब तहसिलदार प्रभाकर नवाळे, ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, परशुराम पाटील, सुभाष गुरव, ईश्वर म्हात्रे आदी उपस्थित होते.

# पुण्याच्या विद्यार्थ्यांचा रोह्यात अभ्यास दौरा

**। रोहा/धाटाव । प्रतिनिधी ।**

पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्राच्या यूपीएससी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या पदवी पूर्व विद्यार्थ्यांचा रोहा तालुका अभ्यास दौरा नुकताच यशस्वी झाला. ८ विद्यार्थी, विद्यार्थिनीनी सहभाग घेतलेल्या या दौऱ्यात रोहा तालुक्यातील प्रशासकीय विविध विभागाकडून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्याचे काम गेली अनेक वर्षांपासून करीत आहे. नुकताच या माध्यमातून त्यांनी प्रामुख्याने रोहा तालुक्याचा महसूल, विकास प्रशासन, समाज संस्कृती, नैसर्गिक संसाधने यासोबतच कल्याणकारी प्रकल्पांची भेट घेऊन एकूण रोहा तालुक्याचा अभ्यास या विद्यार्थ्यांनी तीन दिवसांमध्ये पूर्ण केला आहे.

अभ्यास दौऱ्यामध्ये विद्यार्थ्यांनी रोह्याचे प्रांताधिकारी एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या प्रमुख, तहसीलदार, वन विभागाचे अधिकारी,रोह्याचे पोलीस निरीक्षक यांसह पंचायत समितीतील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. त्याचबरोबर व्ही. आर. टी. आय. पालवी आणि ज्ञानप्रबोधिनी अशा सामाजिक काम करणाऱ्या काम करणाऱ्या संस्थांची भेटी घेऊन या संस्थांचे रोहा तालुक्याच्या विकासामधील योगदान जाणून घेतले. संस्थेच्या माध्यमातून होत असलेल्या शिक्षण, संशोधन, ग्रामविकासन व आरोग्य, संघटन, स्त्री शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता या विषयांवर रोह्यातील पत्रकारांची संस्था रोहा प्रेस क्लबच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन संवाद साधला.

अभ्यास दौऱ्यात अमित कदम, प्रियांका सोडगीर,आयुष शिरोडे, अर्जुन सांडभोर, प्रांजल रोडे, शिवानी चांद्गुडे, सानुजा जाधव, समृद्धी स्वामी यासह त्यांच्या सहकारी वर्गाने अभ्यास दौऱ्यासाठी विशेष सहकार्य केलेल्या सर्वच विभागांचे, संस्थांचे आभार मानले.

**गणेशोत्सवानिमित्त रंगीत तालीम सुरू | चाकरमानी या कलेपासून दुरावला**

# लोककलांना पुन्हा सुगीचे दिवस

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्राला लोककलेची मोठी परंपरा लाभली आहे. विशेषत: कोकणात दशावतारी नाटक, शक्तीतुरा, डबलबारी, भजन, कीर्तन आणि जाखडी नृत्य किंवा बाल्या नाच या लोप पावत चाललेल्या लोककलांना पुन्हा सुगीचे दिवस येतांना आहेत. गणेशोत्सवानिमित्त रायगड जिल्ह्यात गावा-गावात लोककलांची रंगित तालीम सुरू झाली आहे.**

भाद्रपद महिन्यात गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यामध्ये कोकणात या लोककला प्रत्येक गावात सादर होत असतात. सध्या नोकरीनिमित्त शहराकडे आलेला चाकरमानी या कलेपासून दुरावला आहे. म्हणूनच सुधागड तालुक्यातील श्री दत्त गुरु नाच मंडळ यांचा जाखडी नाच २२ वर्ष बंद होता. मात्र, येथील नवतरूण मुलांनी तो परत चालू केला आहे. ही कोकणातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी हे मंडळ तत्पर आहे. चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने २२ वर्षांनी जाखडी नृत्याची जमवाजमव सुरू केली आहे. पारंपरिक जाखडी नृत्याचा बाळकूम येथील मरू आईच्या मंदिरात शुभारंभ करण्यात आला. आता दर शनिवार-रविवार या मंडळाची रंगित तालिम येथे सुरू असते. विशेष म्हणजे गावच्या तरुण मंडळींचा या नृत्यात मोठा सहभाग असतो. तर ठाणे आणि भिवंडीमध्ये पुंडलिक मोरे यांच्या माध्यमातून नवीन होतकरू कलाकार मंडळींना तेजस मोरे, सौजस मोरे हे लोकसंगिताचे धडे देत आहेत. गावची कलाकार मंडळी फावल्या वेळात जाखडी नृत्य, शक्ती तुरा, भजन कीर्तन यात दंग होत आहेत.



> आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनी देखील हि पारंपरिक कला अधिक समृद्ध करावी यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नाच ही कला जतन करत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देवून सहकार्य करतात. पारंपारीक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. गणेशोत्सव निमित्त सराव सुरु केला आहे.
> –समाधान म्हात्रे कलाकार, दुरशेत, पेण

खरंतर लोककला जपणे आणि आपली संस्कृती टिकवण्यासाठी ही मंडळी अहोरात्र मेहनत घेत आहेत.

## निवडक



### रानभाजी महोत्सवाला प्रतिसाद

**माथेरान :** थंड हवेचे आणि निसर्ग संपदांनी नटलेले माथेरान हे नेहमीच पर्यटकांचे आकर्षण राहिले आहे. विशेषतः श्रावण महिन्यात या डोंगरकपारींमध्ये औषधी गुणांनी युक्त रानभाज्या मोठ्या प्रमाणावर उगवतात. आदिवासी समाज या भाज्या गोळा करून विक्री करतो व त्यावर उदरनिर्वाह चालवतो. नागरिकांकडून यांना श्रावणात प्रचंड मागणी असते. या पार्श्वभूमीवर माथेरान कोकणवासीय समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत सुतार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला ङ्गरानभाजी महोत्सवफ माथेरान कम्युनिटी सेंटर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या उद्घाटन भालचंद्र सावंत, कांचन केतकर, सारिका पाटील, परेंदु मोरे रिया दळवी व यांच्या हस्ते करण्यात आले. या महोत्सवात रानभाज्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. भाज्यांचे औषधी गुणधर्म, आरोग्यदायी फायदे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच या भाज्यांपासून तयार केलेले स्वादिष्ट पदार्थ नागरिकांना चाखण्यासाठी ठेवण्यात आले होते. याशिवाय बांबूपासून बनविलेल्या वस्तू, शिंपल्यांपासून तयार दागिने आणि रानभाज्यांवरील माहितीपूर्ण पुस्तके यांच्या छोट्या स्टॉल्सनी महोत्सवाला आणखी रंगत आणली. या उपक्रमाला शाळकरी विद्यार्थी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. पावसाची जोरदार बॅटिंग सुरू असतानाही नागरिकांनी उपस्थित राहून महोत्सवाला प्रचंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाजाच्या कार्यकारिणी सदस्यांसह महिला, पुरुष आणि तरुणांनी उत्साहाने योगदान दिले. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार आयोजित व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. रानभाज्यांची माहिती आणि चव पुढील पिढीपर्यंत पोहोचावी हा महोत्सवाचा उद्देश निश्चित साध्य झाला आहे, असे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.



### विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील गरीब गरजू मुलांना खालापूर पोलिसांच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी वावोशी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील पोलीस हवालदार चौधरी यांच्या हस्ते मुलांना गणवेश वाटप देण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या घरत, वावोशी गावचे माजी तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद वालम, मयूर धारवे, रिया वालम, मनीष पाटील, दांडवाडी शाळेचे मुख्याध्यापक पालांडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत शाल व पुष्पगुच्छ देऊन विद्या घरत यांनी केले. सूत्रसंचालन मानसी केदारे तर आभार सुनील पवार यांनी केले.



### श्रावणी सोमवारची महाआरती

**चिरनेर :** आवरे येथील शिवभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या भोलानाथ मंदिरात चौथ्या श्रावणी सोमवारी आरती मंडळाच्या वतीने महाआरतीचा कार्यक्रम पार पडला. श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारच्या महाआरतीचा मान भारती गावंड तसेच ऋषिकेश गावंड यांना मिळाला. दरम्यान ही महाआरती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात पार पडली. आरंभी गणेशप्रसाद गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली गायनाला सुरुवात झाली. त्यानंतर नरेश गावंड, सुधाकर म्हात्रे, महेश गावंड, विद्याधर गावंड, हितेंद्र म्हात्रे, अभिषेक गावंड, दिव्यांशू केणी यांच्याही शिवभक्तांना सुरावटी ऐकावयास मिळाल्या. याप्रसंगी निरूबाई पाटील, कुमुदिनी गावंड, रश्मी ठाकूर, शशिकला घरत, छाया गावंड, जयश्री गावंड, रुमावती केणी, कामिनी गावंड, उर्मिला गावंड, तेजस म्हात्रे, प्रदीप गावंड, अमित म्हात्रे आदीजण उपस्थित होते. आरती सोहळ्याचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ज्ञानेश्वर गावंड, अनंत पाटील यांच्यासह गावातील पुरुष महिला नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

### मुळेखंड येथे आरोग्य शिबीर

**उरण :** श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व जायंट्स ग्रुप ऑफ उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने मुळेखंड येथे आरोग्य शिबीर घेण्यात आले. महिला व लहान मुले सुमारे ६० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. दिपेश शहा यांच्या सौजन्याने मोफत औषध देण्यात आली. या कार्यक्रमासाठी महिला व लहान मुले उपस्थित होते. या उपक्रमासाठी संगीता ढेरे, कविता म्हात्रे, वैशाली पाटील, तृप्ती भोईर, मंजू कुमार, सचिन ढेरे, देवेंद्र पिं-पळे, रोशनलाल मेहता, प्रियवंदा तांबोटकर, अमृत ठाकूर, होळकर, नयना पाटील, निशा म्हात्रे, तृप्ती घरत, सुप्रभा म्हात्रे ,उज्वला म्हात्रे राम मदने यांनी उपक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य लाभले.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९**
- **बोलेरो पिकवर ड्रायव्हर पाहिजे. ९४२२१५१४५१**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# अंबा नदीवर नवीन पूल होऊनही उपयोग शून्य



। पाली/बेणसे । वार्ताहर ।

रायगड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा कहर सुरू आहे. मंगळवारी (ता.१९) दुपारी वाकण पाली खोपोली राज्य महामार्गावरील पाली अंबा नदी पुलाच्या जोडरस्त्यावर सखल भागात पाणी भरल्याने दोन्ही बाजूची वाहतूक बंद झाली. परिणामी प्रवासी व वाहक चालक यांचे हाल झाले. नवीन पूल झाला पण उपयोग शून्य असल्याने प्रवाशी, स्थानिक व जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

सततसुरुअसलेल्यापावसाशुळे पाली पोलीस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली वाकण खोपोली राज्य महामार्गावर उन्हेरे व पाली जवळ अंबा नदीची पातळी वाढली असल्याकारणाने पुलाच्या दोन्ही बाजूस मुख्य रोडवर पाणी भरले. त्यामुळे वाकण बाजूकडे व खोपोली बाजूकडे जाणारी वाहतूक बंद झाली. दोन्ही बाजूला पोलिसांनी बॅरिगेट्स टाकून वाहतूक थांबवली. जून महिन्याच्या १९ तारखेला देखील मुसळधार पावसामुळे पुलाच्या दोन्ही बाजूने पाणी गेल्याने या मार्गावरील वाहतूक बंद होती.

## ● पाली अंबा नदी पुल जोड रस्त्याच्या सखल भागात पाणीच पाणी

## पूल झाला पण उपयोग शून्य

अंबा नदीवर उंच व रुंद असा मोठा पूल बांधण्यात आला आहे. या आधी अंबा नदीवरील जुना पूल हा अरुंद व उंचीने छोटा होता. तसेच त्याची क्षमता देखील कमी होती. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून पाणी जाऊन प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी व वाहतूक ठप्प होत होती. नवीन रुंद व उंच पूल बांधल्यामुळे ही समस्या संपुष्टात येऊन पावसाळ्यात वाहतूक सुरळीत राहील, अशी अपेक्षा सर्वसामान्य जनतेला व प्रवाशांना होती. मात्र घडले भलतेच, नवीन मोठा व रुंद पूल झाला मात्र त्याच्या दोन्ही बाजूचा जोडरस्ता हा खाली असल्यामुळे अंबा नदीचे पाणी आता पुलावरून पाणी न जाता या दोन्ही बाजूच्या रस्त्यावरून वाहते व साचत आहे. परिणामी दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होत आहे. एमएसआरडीसी प्रशासनाने या दोन्ही बाजूला मोरी टाकणे किंवा उंच रस्ता करणे गरजेचे होते. मात्र तसे न झाल्यामुळे हकनाक प्रवास्नींव नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

## खुश्कीचा मार्ग पण त्रासदायक

वाकण–खोपोली राज्य महामार्ग मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गाला जोडतो. तसेच, दक्षिण कोकणातून पुणे व मुंबईला जाणारे प्रवासी याच मार्गावरून जातात. हा मार्ग सुस्थितीत असल्यामुळे अनेक प्रवासी व वाहने याचा वापर करतात. मात्र, पालीतील अंबा नदी पूल नव्याने बांध्एयात आला असूनही पुलाच्या दोन्ही सखल बाजूला पाणी साचल्यामुळे प्रवासी व वाहने दोन्ही बाजूस अडकून पडतात व त्यांची गैरसोय होते.

# समुद्रात मासेमारी करिता जाऊ नयेः मुख्याधिकारी सचिन बच्छाव



। आगरदांडा । प्रतिनिधी ।

गेल्या काही दिवसांपासून राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसाचा जोर आजही कायम असून समुद्र खवळलेला आहे. त्यातच समुद्रातील वाऱ्याचा वेग वाढत आहे. या कालावधीत मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये. मुरुड-खोरा बंदरातील समुद्र किनाऱ्यावर लाटांचा जोर वाढला असुन जोराचे वारे वाहत आहेत. समुद्र किनाऱ्यावर समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या आहेत. लाटांचा जोर वाढल्याने किनारपट्टीवरील नागरिकांना तसेच पर्यटकांनी सुरक्षित ठिकाणी राहून पर्यटनाचा आनंद घ्या. समुद्र उतरण्यास धाडस करू नका.आपला जीव लाख मोलाचा आहे. तरी सावधानी बाळगावी. तसेच, कोळी बांधवांनी मासेमारीकरिता समुद्रात जाऊ नये, असा सतर्कतेचा इशारा मुरुड नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी दिला आहे.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
बेलापूर भवन, प्लॉट नं.6, सेक्टर 11, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – 400 614

**रोजगार अधिसूचना**

ट्रॅक मेंटेनर आणि पॉइंट्समन या पूर्वीच्या ग्रुप डी पदासाठी **अधिसूचना क्र: सीओ/पी-आर/04/2025, दिनांक 04.07.2025** नुसार ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम तारीख 24/08/2025 च्या 23:55 वाजे पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**मुख्य कार्मिक अधिकारी**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या शेती मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक भाग्यलक्ष्मी प्रबोध राऊत व प्रबोध प्रभाकर राऊत यांचेकडून खरेदी घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतींवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सोगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १९५ | ०१-०५-०० | २०.८७ |
| १९९/१ | ०१-११-४५ पैकी ०-१०-५० | ८.५६ पैकी ०.८८ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १९/०८/२०२५

**ॲड. रविंद्र वि. ओक**
"गुरुकृपा", अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कशेळे, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./ हि. नं. | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.गणेश विठ्ठल मुंढे व इतर | १८/१० | ००-३४-०० | ०-३० |
| | १८/७/ब | ००-१४-०० | ०-११ |
| | १८/९ | ००-१५-०० | ०-१६ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २०/०८/२०२५

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री.दत्तात्रेय यशवंत भाकरे, रा.ओम जानकी निवास को.ऑप.हौ.सो.लि., ऑफिस नं.१०२, पहिला मजला, घंटाळी रोड, घंटाळी देवी मंदिर नौपाडा ठाणे-४००६०२ यांनी जमीन मालक १.श्री.रुपेश रंभाजी पाटील, २.श्री.सोपान रंभाजी पाटील राहणार भालिवाडी, पो-गौळवाडी, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे-भालिवडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| जमीन मालक | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री.रुपेश रंभाजी पाटील, २.श्री.सोपान रंभाजी पाटील | ४५ | ४ | ०.०९.१० | ०.५६ |

तरी वरील मिळकती बाबत इतर कोणाचाही, कोणताही व कसल्याही प्रकराचा कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

ठिकाण - कर्जत
तारीख : २०/०८/२०२५

**वकील. भावना विशाल पवार**
पत्ता. सीतासावली निवास, गुंडगे
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ७०३०३३१९४८

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे नेरे ता.पनवेल, जि-रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) दिनेश रामचंद्र भोईर रा-हिरानंदानी मेडोज, लोकपुरम सोसायटी ४ था मजला, ४०३ ए विंग, वीणा बिल्डींग ठाणे व क्रं २) वसीमराजा सलीम शेख रा-रॉबर्ट पीटर बिल्डिंग ६ बी, नौपाडा विद्या विहार रोड कुर्ला वेस्ट याची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर (गट क्रमांक) | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| नेरे | १३३ | एकुण क्षेत्रफळ १.४९.७० हे.आर.पॉ पैकी विकत देणार यांच्या नावे असलेले हिश्याचे क्षेत्र. लागवडी योग्य क्षेत्र-०.४७.७५ हे.आर.पॉ पोटखराबा क्षेत्र-०.२७.१० हे.आर.पॉ एकुण क्षेत्रफळ ०.७४.८५ हे.आर.पॉ. या क्षेत्रा बाबत | ३.६१ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) दिनेश रामचंद्र भोईर व क्रं. २) वसीमराजा सलीम शेख यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी, अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे, हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : २०/०८/२०२५

**ॲड भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल. एल. बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता-कर्जत जि-रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे दहिगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) सुरेश शंकर शिंदे २) जोत्स्ना दामोदर कुलकर्णी ३) पांडुरंग शंकर शिंदे ४) भागवत जयराम देशमुख ५) गीता अजित देशमुख ६) माणिक रमेश देशमुख ७) मंगल नंदकुमार कुलकर्णी ८) वनिता सुनिल देशमुख ९) सुनिता सुनिल देशमुख १०) महानंदा शंकर शिंदे आमचे सामाईक नावे वरील वर्णनाची जमीन मिळकत असुन सदरील मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी विकत देत असलेले क्षेत्र ०.२२.०० हे.आर.पॉ. एवढे क्षेत्र आम्ही कायमस्वरूपी विकत देण्याचे ठरवले आहे.

सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | एकुण क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| दहिगाव | ५३ | १/क | एकुण क्षेत्रफळ -०.७७.०० हे.आर.पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ०.२२.०० हे.आर.पॉ. | १०.५० |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी, अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यारपत्र, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात (०७) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : २०/०८/२०२५

**ॲड भारत अंकुश सावंत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता- मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-खांडस, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे मालक श्री. जनार्दन अनंता ऐनकर यांच्या कडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्व्हे नं. | हिस्सा. नं. | क्षेत्र | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३९ | १/अ/१ | ०.६९.७० | २.६० |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील व जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि: १९/०८/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहिर नोटिस

सर्व लोकांना या नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिल यांने मौजे-खांडस, ता-कर्जत, जि-रायगड येथील मिळकती, त्या मिळकतींचे मालक १.श्री.दिपक दत्तु ऐनकर, २. श्रीमती. लक्ष्मीबाई दत्तु ऐनकर, ३.श्रीमती चंद्रभागा दत्तु ऐनकर यांच्या कडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असुन सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३९ | १/ब/१ | मिळकतीचे संपुर्ण क्षेत्र १.७५.५० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे क्षेत्र १.३५.५० पैकी विक्रिचे क्षेत्र ०.५५.०० | ३.७६ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमीन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशील जमीन मालकांच्या दरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत हि निर्वेध व बोजारहित असल्याचे मानून आमचे अशील सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि: १९/०८/२०२५

वकील
**ॲड. सचिन संजय सुर्वे**
पत्ता: नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१
मो. नं ९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे चौल. ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्र. १७३१ क्षेत्र ०-२६-८० हे. आर. आकार ० रुपये ८७ पैसे, ही भातशेती मिळकत माझे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची असुन वरील मिळकतीचे हक्कनोंद दप्तरी ७/१२ सदरी माझे नांव भोगवटाधारक म्हणुन आहे. सदर मिळकती संदर्भात कुणीही इसमांनी कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध प्रस्थापित करु नये. तसेच सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान बक्षीस लीज, फरोक्त साठेकरार अन्न वस्त्राचा बोजा, वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क प्रस्थापित करु नये. किंवा माझ्या परवानगी शिवाय माझे मिळकती मध्ये तिऱ्हाईत इसमांनी हक्क हितसंबंधी प्रस्थापित करु नये. तसे केल्यास मी मिळकतीचा मालक म्हणुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. १८-८-२०२५

सही/-
**अमोल अरुण राईलकर**
रा.न्यू यशवंत सोसा.३ रा मजला
ठाणे-पश्चिम

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीनमिळकत संदर्भित जमीनमिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. सुहास शांताराम म्हात्रे, २) श्रीमती कल्पना मुरलीधर म्हात्रे व ३) श्रीमती शैला संजीवन पाटील यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान मालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीन मिळकतीमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे /व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १० दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतीचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**-: संदर्भित जमीनमिळकतीचे परिशिष्ट :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| वैजाळी, ता. अलिबाग, जि. रायगड. | १७५/२ (मूळ सर्व्हे नं. ३५/४) | ०-१३-०० | ०.२२ |

संदर्भित जमीनमिळकतीच्या चतु:सीमा
पूर्वस : गट नं. १७४ ही जमीन मिळकत.
पश्चिमेस : गट नं. १७६ ही जमीन मिळकत.
दक्षिणेस : गट नं. १६५ ही जमीन मिळकत.
उत्तरेस : गट नं. १७५/१ ही जमीन मिळकत,

अलिबाग,
दिनांक : २०/०८/२०२५.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट,
कृष्णवंदन-२, ब्राह्मणआळी, कन्याशाळेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड,
मो.९८२२५२८९३१
ईमेल -adv.rdpatil@gmail.com

## जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव, जि. रायगड
दिनांक :- १९-८-२०२५

**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता. माणगाव, जि. रायगड**
**विकास कामाची निविदा खालीलप्रमाणे**

| अ. क्र | कामाचे नाव/ साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उमरोली-दिवाळी बौद्धवाडी येथील विनिता गायकवाड ते मिलिंद साळवी यांचे घरापर्यंत रस्ता करणे. | ७३७००/- | २००/- | ७३७/- | २५/८/२०२५ सायं ०५:०० वा | २६/८/२०२५ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२६ | ग्रामनिधी १५% मागास वर्गीय खर्च |

**अटी व शर्ती :**
१. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३. उपलब्ध निधीनुसार देयके आदा करणेत येईल.
४. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता.माणगाव, जि. रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
५. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
७. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

**सही**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

**सही**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस ह्या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गावठाण नं. १/१०५, एकूण क्षेत्र ०-०१-३० हे.आर.चौ.मी., आकार ०.००, लागवड घरपड इतक्या क्षेत्राच्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम. कुसूम शांताराम कदम, श्रीम. सुंदराबाई आत्माराम कदम, श्रीम. विमल दत्ताराम खेराडे, श्री. मधुकर काशिनाथ चव्हाण, श्री. अशोक काशिनाथ चव्हाण, श्री. दिपक काशिनाथ चव्हाण, श्री. प्रकाश काशिनाथ चव्हाण, श्री. सुनिल काशिनाथ चव्हाण, श्री. पंकज काशिनाथ चव्हाण, श्रीम. जयश्री राजाराम यादव, श्रीम. विलासिनी विलास साळुंखे, श्रीम. मंगला परशुराम चव्हाण, १. श्री. प्रदिप परशुराम चव्हाण, २. श्री. प्रविण परशुराम चव्हाण, ३. श्री. प्रशांत परशुराम चव्हाण, क्र. १ ते ३ यांचे करीता अ.पा.क. आई मंगला वर उल्लेखित ७/१२ वरील नमुद मालकांमधील श्रीम. मंगला परशुराम चव्हाण, श्री. प्रदिप परशुराम चव्हाण, श्री. प्रविण परशुराम चव्हाण, श्री. प्रशांत परशुराम चव्हाण, रा. मु. कसबापेठ श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांनी वर नमुद मिळकती करीता त्यांचे वतीने कार्य करणेकरीता श्री. प्रकाश काशिनाथ पेढामकर यांस मा. कार्यकारी दंडाधिकारी साो., श्रीवर्धन यांचे कार्यालयात दि. ३१/०५/२००८ रोजी प्रतिज्ञापत्रान्वये कुळअखत्यारपत्र दिले होते. वर नमुद मिळकती संबंधी कुळअखत्यारपत्र मा. कार्यकारी दंडाधिकारी साो, श्रीवर्धन यांचे कार्यालयात र.नं. २३५१ अन्वये प्रतिज्ञापत्र केले आहे. सबब वर उल्लेखित मिळकती संबंधातील वर नमूद कुळअखत्यारपत्र अंतर्गत श्री. प्रकाश काशिनाथ पेढामकर यांना दिलेले सर्व अधिकार तात्काळ रद्द करण्यात आले आहेत. सदरील कुळअखत्यारपत्र माध्यमातून दिलेले सर्व अधिकार दि. २०/०८/२०२५ रोजी पासून रद्द करण्यात आले आहेत. यामुळे श्री. प्रकाश काशिनाथ पेढामकर यांना श्रीम. मंगला परशुराम चव्हाण, श्री. प्रदिप परशुराम चव्हाण, श्री. प्रविण परशुराम चव्हाण, श्री. प्रशांत परशुराम चव्हाण यांचे वतीने कोणतेही कृत्य करण्यास कोणतेही अधिकार व कर्तव्य असणार नाहीत.

सर्व संबंधित व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्राधिकरणांना याद्वारे सूचित केले जाते की, या नोटीसचा आदर करण्यात यावा व यानंतर या कुळ अखत्यारपत्राच्या आधारावर कोणतीही व्यवहार करू नये तसेच या जाहीर नोटीसीच्या तारखेनंतर संबंधित कुळअखत्यारपत्र द्वारे केलेले कोणतेही व्यवहार रद्दबातल ठरतील.

ठिकाण : श्रीवर्धन
दिनांक : २०/०८/२०२५

सही/-
**ॲड. गोदावरी सुरेश करडे**
बी.एस.सी.एल.एल.एम.
रा.मु. कसबापेठ, पो.ता. श्रीवर्धन, जि. रायगड

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकतीचे मालकांनी खालील नमुद मिळकत आमचे अशिलाना विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणताही हक्कहितसंबंध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोडपत्र, बक्षिस, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

**मौजे खांडपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत**

| मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १.अतुल गणपत भोसले २.वीणा नितीन झोरे ३.अनुश्री निलेश घाडगे | २६ | १/ब | ०-१४-५० पो.ख.०-०५-५० एकूण : ०-२०-०० | १-५० |

वरील प्रमाणे मिळकत त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

ता.१९ ऑगस्ट २०२५

खरेदीदारातर्फे
**सौ.पुजा एस.कोंडेकर**
ॲडव्होकेट व नोटरी
ऑफीस : "गणेश अपार्टमेंट" तळ मजला,
कोतवाल नगर, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं. ९४२२०७१९८६ मो.नं.९११२३४०८०८

## खरेदीचे व्यवहारास हरकत असल्याबाबत जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मी श्री.रमेश बाबु विशे, रा.पाषाणे, ता.कर्जत जि.रायगड ४१०१०१ व माझा भाऊ दौलत बाबु विशे यांनी परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही विक्री करणेबाबत १) श्री.यशवंत तुकाराम धुळे व २) श्री. अशोक यशवंत धुळे, रा. पाषाणे ता. कर्जत जि. रायगड ४१०१०१ यांस विक्री करणेकरीता खरेदीचा दस्तऐवज निष्पादन करून नोंदणी केलेला आहे. परंतु सदरील खरेदीचे दस्तऐवजाप्रमाणे निश्चित करण्यात आलेला सर्व मोबदला हा आम्हांस पुर्ण पोहोच झालेला नाही. त्याबाबत आम्हांस कायदेशीर कार्यवाही करण्याची आहे. सबब, या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की सदरील मिळकतीबाबत इतर कोणीही त्रयस्थ इसम यांनी १) श्री.यशवंत तुकाराम धुळे व २) श्री.अशोक यशवंत धुळे, रा.पाषाणे, ता.कर्जत जि.रायगड ४१०१०१ यांचेसोबत कोणताही व्यवहार करू नये याउपर कोणीही सदरील मिळकतीबाबत कोणताही व्यवहार केल्यास त्याबाबत होणारे खर्चाची व परिणामांची खर्चासहीत संपुर्ण जबाबदारी हि सदरील व्यवहार करणारे व्यक्ती व संस्था यांची असेल याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| अ. क्र. | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे. | क्षेत्र आर. | क्षेत्र पॉ | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७३ | ३ अ | ० | ४७ | ०० | १ | ५० |

सदरील मिळकतीपैकी विक्री केलेले क्षेत्र हे.आर.पॉ ०-२७-०० इतके

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही / -
**श्री.रमेश बाबु विशे**
दिनांक :-२०/०८/२०२५
मो.नं.८६६९४३७९९९
पत्ता. रा.पाषाणे, ता.कर्जत,
जि. रायगड ४१०१०१.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुरास अथवा दाव्याच्या पूर्तिसंदर्भातीलकोणतीहीजबाबदारीनागेशपब्लिशर्सप्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## सलिया समनवर पाच वर्षांची बंदी

**नवी दिल्ली :** श्रीलंकेचा माजी राष्ट्रीय क्रिकेटपटू सलिया समनला भ्रष्टाचाराच्या आरोपांमध्ये दोषी ठरवत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदच्या (आयसीसी) भ्रष्टाचारविरोधी न्यायाधिकरणाने पाच वर्षांसाठी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निलंबित केले आहे. समन हा त्या आठ जणांपैकी एक आहे, ज्यांच्यावर सप्टेंबर २०२३



मध्ये अमिरात क्रिकेट बोर्डाच्या भ्रष्टाचारविरोधी संहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. हे आरोप २०२१ मधील अबूधाबी टी-१० क्रिकेट लीग दरम्यान सामने किंवा स्पॉट फिक्सिंग करण्याच्या प्रयत्नांशी संबंधित होते. ही कारवाई ईसीबीच्या संहितेनुसार नियुक्त भ्रष्टाचारविरोधी अधिकारी यांच्या हस्तक्षेपामुळे उधळली गेली होती. संपूर्ण सुनावणी आणि दोन्ही बाजूंच्या युक्तिवादांनंतर न्यायाधिकरणाने समनला संहितेच्या अनुच्छेद २.१.१ नुसार सामने फिक्स करण्याचा, कटकारस्थान करण्याचा किंवा बेकायदेशीर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केल्याबद्दल दोषी ठरवले आहे.

## प्रसाद लढणार केएससीएची निवडणूक

**नवी दिल्ली :** भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेची (केएससीए) निवडणूक



लढणार आहे. ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान या निवडणुका होण्याची शक्यता आहे. अनिल पुंबळे अध्यक्ष असताना प्रसादने २०१३ ते २०१६ या कालावधीत केएससीएचे उपाध्यक्षपद सांभाळले होते; परंतु, तेव्हापासून त्याने संघटनेपासून स्वतःला दूर ठेवले आणि प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. व्यंकटेश प्रसादच्या पॅनेलमध्ये अनुभवी सदस्य विनय मृत्युंजय यांचाही समावेश असेल. मृत्युंजय हे केएससीएचे माजी कोषाध्यक्ष आणि बीसीसीआयच्या वित्त समितीचे सदस्य आहेत. विद्यमान रघुराम भट्ट यांच्या नेतृत्वाखालील केएससीए कार्यकारिणीचा कार्यकाळ ३० सप्टेंबर रोजी संपणार आहे.

## अजित आगरकरांनी सांगितले यशस्वी, श्रेयसला वगळण्याचे कारण

**नवी दिल्ली :** अगामी आशिया चषका साठीच्या भारतीय संघातून अनेक मोठी नावे बाहेर पडली आहेत. तुफानी ओपनिंग फलंदाज यशस्वी जयस्वाल १५ सदस्यीय संघात नाही. तसेच जबरदस्त फॉर्ममध्ये असूनही श्रेयस अय्यरलाही संघात स्थान मिळालेले नाही. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी पत्रकार परिषद घेऊन भारतीय संघाची घोषणा केली. याच पत्रकार परिषदेत अजित आगरकर यांनी




जयस्वाल आणि अय्यर का निवडले गेले नाहीत याचे कारण सांगितले. अजित आगरकर यांनी सांगितले की, यशस्वी जयस्वालसाठी हे खूप दुर्दैवी आहे, कारण अभिषेक शर्मा उत्तम खेळ करत आहे. गरज भासल्यास तो गोलंदाजीही करू शकतो. त्यामुळे त्यापैकी एखाद्याला बाहेर राहावेच लागणार होते. श्रेयस अय्यरसाठीही मी हेच म्हणेन, यात त्यांचा काहीही दोष नाही. श्रेयस अय्यरने डिसेंबर २०२३ पासून एकही टी-२० सामना खेळलेला नाही; परंतु, व्हाईट बॉल फॉरमॅटमधील त्याची अलीकडची कामगिरी आशिया चषकात भारतीय संघाचा तुरुपाचा पत्ता ठरवू शकली असती. अय्यरने आतापर्यंतच्या ५१ टी-२० सामन्यांच्या कारकिर्दीत ३०.६७ च्या सरासरीने १,१०४ धावा केल्या आहेत. टीम कॉम्बिनेशनमुळे यशस्वी जायसवाल १५ सदस्यीय संघात स्थान मिळवू शकला नसला तरी त्याला पाच स्टँडबाय खेळाडूंमध्ये संधी देण्यात आली आहे. एखादा खेळाडू दुखापत किंवा इतर कुठल्याही कारणामुळे स्पर्धेत खेळू शकला नाही, तर त्या परिस्थितीत जायसवाल किंवा इतर कोणत्याही स्टँडबाय खेळाडूला आशिया कपमध्ये खेळण्याची संधी मिळू शकते, असे अजित आगरकर यांनी सांगितले.



## पाकिस्तान ऐवजी बांग्लादेशला संधी?

**नवी दिल्ली :** पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाकिस्तानच्या जागी बांगलादेश संघाचा समावेश होऊ शकतो. ही स्पर्धा २९ ऑगस्टपासून बिहारच्या राजगीर येथे सुरू होणार आहे. पाकिस्तान हॉकी महासंघाने सुरक्षा कारणास्तव भारतात येण्यास नकार दिल्याने हा बदल घडू शकतो. पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा दिला जाईल, असे केंद्र सरकारने आधीच स्पष्ट केले आहे; मात्र, पाकिस्तानकडून अद्याप अंतिम पुष्टी झालेली नाही. आयोजकांनी आठ संघांच्या या स्पर्धेत पाकिस्तानच्या जागी बांगलादेशाला सहभागी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. हॉकी इंडियाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, केंद्र सरकारने पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा देण्याची तयारी दाखवली आहे. मात्र, जर त्यांना भारतात यायचेच नसेल तर ती आमची समस्या नाही. पाकिस्तान संघ या स्पर्धेत सहभागी झाला नाही तर बांगलादेशला आधीच आमंत्रण दिले आहे; मात्र, अंतिम पुष्टीसाठी आणखी ४८ तास वाट पाहावी लागेल. पाकिस्तानकडून किंवा बांगलादेशकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही.

# आशिया चषकासाठी भारतीय संघाची घोषणा

## सुर्याच्या नेतृत्वाखाली १५ शिलेदार लढणार




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अगामी आशिया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा अखेर झाली आहे. भारतीय संघाचे निवड समीतीचे प्रमुख आजित आगरकर यांनी मंगळवारी (दि.१९) पत्रकार परिषेदत आशिया चषक २०२५साठी भारतीय संघातील १५ खेळाडूंची नावे जाहीर केली आहेत. ही स्पर्धा टी-२० स्वरूपातली असून भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा सूर्यकुमार यादवकडे सोपविण्यात आली आहे. तर, उपकर्णधारपद शुबमन गिलकडे देण्यात आले आहे.

मागील बऱ्याच दिवसांपासून भारतीय संघाच्या ताफ्याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर मंगळवारी आजित आगरकर यांच्या नेतृत्वाखाली संघ व्यवस्थापनाने अगामी आशिया चषकासाठी भारतीय खेळाडूंची घोषणा केली. पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाचा विचार करुन भारतीय व्यवस्थापनाने हा संघ निवडला आहे. त्यामुळे भारतीय संघ पुन्हा एकदा सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या स्पर्धेसाठी मैदानावर उतरणार आहे. भारताला 'अ' गटात यजमान युएई, पाकिस्तान आणि ओमान यांचा सामना करावा लागणार आहे. १४ सप्टेंबरला होणाऱ्या भारत विरूद्ध पाकिस्तान यांच्यातल्या सामन्याची सर्वांना उत्सुकता लागली आहे.

दरम्यान, भारतीय संघ दुपारी दिड वाजता जाहीर होणार होता; परंतु, मुंबईतील मुसळधार पावसामुळे त्याला विलंब झाला. बीसीसीआयचे सचिव आणि अन्य पदाधिकारी दुपारी अडीच वाजता मुंबईत पोहोचले आणि त्यानंतर बैठकीला सुरुवात झाली. यावेळी शूभमन गिल, यशस्वी जैस्वाल, मोहम्मद सिराज व जसप्रीत बुमराह या कसोटी क्रिकेट खेळणाऱ्या प्रमुख खेळाडूंच्या समावेशावरून बरीच चर्चा रंगली होती. त्यावरून निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांनी बाजू मांडली. सूर्यकुमार दुखापतीतून सावरून पुन्हा मैदानावर परतत आहे. तसेच, पुढच्या वर्षीच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने ही अगामी आशिया चषक स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे.

### भारतीय संघ

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उप कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्थी, रिंकू सिंग.
राखीव: रियान पराग, यशस्वी जयस्वाल, प्रसिद्ध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर, ध्रुव जुरेल.

### सामन्यांचे वेळापत्रक

९ सप्टेंबर: अफगाणिस्तान वि. हाँगकाँग
१० सप्टेंबर: भारत वि. यूएई
११ सप्टेंबर: बांगलादेश वि. हाँगकाँग
१२ सप्टेंबर: पाकिस्तान वि. ओमान
१३ सप्टेंबर: बांगलादेश वि. श्रीलंका
१४ सप्टेंबर: भारत वि. पाकिस्तान
१५ सप्टेंबर: यूएई वि. ओमान
१५ सप्टेंबर: श्रीलंका वि. हाँगकाँग
१६ सप्टेंबर: बांगलादेश वि. अफगाणिस्तान
१७ सप्टेंबर: पाकिस्तान वि. यूएई
१८ सप्टेंबर: श्रीलंका वि. अफगाणिस्तान
१९ सप्टेंबर: भारत वि. ओमान
२० ते २६ सप्टेंबर पात्रता सामने
२८ सप्टेंबर: अंतिम सामना
(सर्व सामने दुबई व अबू धाबी येथे पार पडणार आहेत)

## बाबर-रिझवानला आणखी एक धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**




पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचा सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट जाहीर झाला आहे. त्यात पाकिस्तानच्या काही महत्त्वाच्या खेळाडूंना धक्का बसला आहे. विशेषतः बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना आशिया चषकासह सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्येही मोठा फटका बसला आहे. या सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमध्ये एकही खेळाडू 'ग्रेड अ' मध्ये नाही. गेल्या वर्षी 'ग्रेड अ' मध्ये असलेले बाबर आणि रिझवान यांना खराब कामगिरीमुळे 'ग्रेड ब' मध्ये टाकण्यात आले. त्यांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील अलीकडच्या खराब कामगिरीमुळे त्यांना हे नुकसान सहन करावे लागले. याउलट, काही खेळाडूंची कामगिरी चांगली झाल्यामुळे त्यांना प्रमोशन मिळाले आहे. अबरार अहमद, हारिस रैफ, सलमान अली आगा, सॅम अयुब, आणि शादाब खान या पाच खेळाडूंना 'ग्रेड क' मधून 'ग्रेड ब' मध्ये स्थान देण्यात आले आहे.

## सिनर सिनसिनाटी ओपनच्या अंतिम फेरीत

**नवी दिल्ली :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जॅनिक सिनरने त्याच्या २४ व्या वाढदिवशी सिनसिनाटी ओपनमध्ये शानदार विजय नोंदवला. त्याने उपांत्य फेरीत फ्रेंच पात्रता फेरीतील टेरेन्स एटमनचा ७-६, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.आता अंतिम फेरीत, सिनरचा सामना स्पॅनिश स्टार कार्लोस अल्काराझशी होईल, ज्याने दुसऱ्या उपांत्य फेरीत अलेक्झांडर झ्वेरेव्हचा ६-४, ६-३ असा पराभव केला. आतापर्यंत सिनर आणि अल्काराज यांच्यात १३ सामने झाले आहेत. यामध्ये अल्काराजने ८ वेळा विजय मिळवला आह.

## पहिल्याच सामन्यात पृथ्वीची शतकी कामगिरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईकडून महाराष्ट्र संघात खेळण्याचा निर्णय घेणाऱ्या पृथ्वी शॉने पहिल्याच सामन्यात आपली धमक दाखवली. ऋतुराज गायकवाड त्रिफळाचीत होऊन १ धावांवर बाद झाला. त्यावेळी महाराष्ट्राची ७१/० वरून ८६/४ अशी अवस्था झाली होती. मात्र, पृथ्वीने एकाकी खिंड लढवत आपले शतक पूर्ण केले.

बुची बाबू चषक स्पर्धेतील महाराष्ट्र विरुद्ध छत्तीसगड या लढतीत पृथ्वीने खणखणीत शतक झळकावले. ऋतुराज गायकवाड सरळ चेंडूवर त्रिफळाचीत झाल्याने महाराष्ट्राची डोकेदुखी वाढली. मात्र, पृथ्वीने एकाकी खिंड लढवली. प्रथम फलंदाजी करताना छत्तीसगड संघाचा पहिला डावा पहिल्याच दिवशी २५२ धावांवर गुंडाळला गेला. विकी ओस्तवाल व हितेश वाळुंज यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. तर, राज्यवर्धन हंगर्गेकर, सिद्धेश वीर व ऋतुराज गायकवाड यांनी प्रत्येकी १ बळी टिपला. ऋतुराजने एक अप्रतिम रन आऊटही केला. छत्तीसगड संघाकडून संजीत देसाईने ९३ धावांची, तर अवनीश धलिवालने ५२ व शुभम अग्रवालने ४१ धावांची खेळी केली. महाराष्ट्राला पृथ्वी शॉ व सचिन धस यांनी चांगली सुरुवात करून दिली. मात्र, सचिन १० धावांवर माघारी परतला. त्यानंतर सिद्धेश वीर (४), ऋतुराज (१) व कर्णधार अंकित बावणे (०) हे देखील स्वस्त्यात माघारी परतले. त्यामुळे १ बाद ७१ वरून ४ बाद ८६ अशी महाराष्ट्राची अवस्था झाली. परंतु, त्यानंतर पृथ्वी शॉ एकटा मैदानावर उभा राहिला. दुसऱ्या दिवसाच्या लंच ब्रेकपर्यंत संघाला ४ बाद ११७ धावांपर्यंत पोहोचवले. लंच ब्रेकनंतर पृथ्वीने आक्रमक फटकेबाजी करत आपले शतक पूर्ण केले.



## द. आफ्रिकेकडून कांगारूंचा दारूण पराभव

**। केर्न्स । वृत्तसंस्था ।**




दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात टी-२० मालिकेनंतर एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. पहिल्या एकदिवसीयमध्ये दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाचा मोठा पराभव केला आहे. यांच्यातील पहिल्याच एकदिवसीय सामन्यात गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळाला. शिवाय दोन्ही संघातील सलामीवीरांचे शतक अवघ्या काही धावांनी हुकले. तर, फिरकीपटू ट्रॅव्हिस हेड आणि केशव महाराज यांनी फिरकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ बाद २९६ धावा केल्या. सलामीवीर एडन मारक्रम आणि रायन रिकल्टन यांनी चांगली सुरूवात केली. परंतु, रिकल्टन ३३ धावा करत बाद झाला. मारक्रमने ८१ चेंडूत ८२ धावा केल्या. याशिवाय कर्णधार तेंबा बावुमाने ७४ चेंडूत ६५ धावांची खेळी केली. तर, मॅथ्यू ब्रिटझकेने ५६ चेंडूत ५७ धावा केल्या. यानंतर ट्रॅव्हिस हेडने आफ्रिकेच्या टी-२० मालिकेतील शतकवीर डेवाल्ड ब्रेविसला ६ धावांवर बाद केले. तर, वियान मुल्डरने ३१ धावांची खेळी करत संघाला ३०० धावांच्या जवळ नेले. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने ४, द्वारशुईसने २ तर झाम्पाने १ बळी घेतला.

आफ्रिकेने दिलेल्या ३०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरूवात केली; परंतु, केशव महाराजने मात्र ऑस्ट्रेलियाच्या इतर कोणत्याच फलंदाजाला मैदानावर टिकू दिले नाही. केशव महाराजने मार्नस लबुशेन (१), कॅमेरून ग्रीन (३), जोश इंग्लिस (५) आणि एलेक्स कॅरीला (०) माघारी धाडले. केशव महाराजने कमालीचा स्पेल टाकत संघाला विजयाच्या दिशेने नेले. महाराजने १० षटकांत १ मेडेन षटक टाकत ५ बळी घेत ३३ धावा दिल्या. तसचे, सुब्रायणने ट्रॅव्हिस हेडला २७ धावांवर बाद केले.

## टेनिस स्पर्धेत नामांकित खेळाडूंचे आकर्षण

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

वर्षातील अखेरची ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धा अशी ख्याती असलेल्या अमेरिकन खुल्या स्पर्धेने या वर्षीपासून नवा पायंडा पाडला आहे. एकेरीच्या स्पर्धेच्या जवळपास आठवडाभर आधीच मिश्र दुहेरीच्या लढतींना सुरुवात होत आहे. या दोनदिवसीय स्पर्धेला मंगळवारपासून सुरुवात झाली असून यात नामांकित खेळाडूंच्या सहभागाचे आकर्षण आहे. या स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश देण्यात आला आहे. त्यात पुरुष एकेरीतील अग्रमानांकित यानिक सिन्नेर आणि कॅटेरिना सिनियाकोवा यांचाही समावेश आहे. कार्लोस अल्कराझ एमा रॅडुकानुसह खेळणार असून, पहिल्या फेरीत त्यांची गाठ अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रॅपर या जोडीशी पडणार आहे. त्याच वेळी सिन्नेर-सिनियाकोवा पहिल्या फेरीत ॲलेक्झांडर इव्हेरेव आणि बेलिंडा बेंचिच जोडीविरुद्ध खेळणार आहे. नोव्हाक जोकोविच आणि ओल्गा डॅनिलोविच जोडीसमोर डॅनिल ममदवेदेव आणि मीरा आंद्रिवा जोडीचे आव्हान असणार आहे.एकेरीतील बहुतेक आघाडीचे खेळाडू या वेळी मिश्र दुहेरीत खेळणार आहेत. अमेरिकन स्पर्धेतील दोन वेळची विजेती नाओमी ओसाकला गेल मोंफिस, कॅरोलिना मुचोवाला आंद्रे रुब्लेव आणि लॉरेन्झो मुसेट्टीला केटी मॅकनॅलीची साथ लाभेल. मुसेट्टी जॅस्मिना पाओलिनीच्या साथीत खेळणार होता. मात्र, ती सिनसिनाटी स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत पोहोचल्याने तिने अमेरिकन स्पर्धेच्या मिश्र दुहेरीतून माघार घेतली.



## हॉजच्या पायाचा घोटा निखळला

**। नॉटिंगहॅम । वृत्तसंस्था ।**



नॉटिंगहॅममधील ट्रेंट ब्रिज येथील सामन्यादरम्यान ट्रेंट रॉकेट्सचा फलंदाज ॲडम हॉजचा एक दुर्दैवी अपघात झाला आणि त्याला रुग्णालयात दाखल करावे लागले. सदर्न ब्रेव्ह विरुद्धच्या सामन्यादरम्यान हॉजला गंभीर दुखापत झाली. ही घटना पहिल्या डावाच्या शेवटच्या काही षटकांमध्ये घडली. पहिल्या डावात फक्त २० चेंडू शिल्लक होते. मिड-विकेटला क्षेत्ररक्षण करत असलेल्या हॉजने मायकेल ब्रेसवेलचा उत्तम फटका खेळलेला चेंडू रोखण्याचा प्रयत्न केला; परंतु, त्याचा पाय घसरला आणि त्याचा घोटा मुरगळला. पाहता पाहता त्याचा पाय अक्षरशः उलटा झाल्याचे दिसले. त्याच्या पायाचे हाड अचानक सरकल्याने त्याला दुखापत झाली. पायाला दुखापत होताच हॉज मैदानावर बसला आणि वेदनेने कळवळताना दिसला. त्यानंतर त्याला मैदानातून थेट रुग्णालयात नेण्यात आले.

**महिलांचा एकदिवसीय संघ जाहीर | हरमनप्रीत कौरवर विश्वचषकाची जबाबदारी**

## १२ वर्षांनंतर भारतात महिला विश्वचषक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**




आगामी महिला एकदिवसीय चषकासाठी भारतीय संघाची घोषणा झाली आहे. हरमनप्रीत कौर कर्णधारपद सांभाळणार असून स्मृती मानधना उपकर्णधार असणार आहे. विशेष म्हणजे भारतात १२ वर्षांनंतर महिला एकदिवसीय विश्वचषक खेळवला जाणार आहे.

यावर्षी भारतीय क्रिकेट चाहत्यांना मायदेशात एकदिवसीय विश्वचषक सामने पाहायला मिळणार आहेत. यावर्षी महिला एकदिवसीय विश्वचषक भारत आणि श्रीलंका येथे खेळवण्यात येणार आहेत. ३० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या या विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय महिला संघाची मंगळवारी (दि.१९) घोषणा झाली आहे. तर, १४ ते २० सप्टेंबर दरम्यान ऑस्ट्रेलिया महिला संघाविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय मालिकेसाठीही भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाचे कर्णधारपद हरमनप्रीत कौर सांभाळणार असून उपकर्णधारपद स्मृती मानधनाकडे सोपविण्यात आले आहे. परंतु, शफाली वर्माला संधी मिळालेली नाही. ऑस्ट्रेलिया मालिका आणि विश्वचषकासाठी जवळपास सारखाच संघ आहे. केवळ सायली सतघरे हिला ऑस्ट्रेलिया मालिकेसाठी निवडण्यात आले आहे. तसेच, अमनजोतला विश्वचषक स्पर्धेसाठी निडण्यात आले आहे. यावर्षी होणाऱ्या महिला विश्वचषकमध्ये भारत आणि श्रीलंका या यजमान देशांसह ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, बांगलादेश आणि पाकिस्तान या देशांचे संघ सहभागी होणार आहेत.

१२ वर्षांनंतर भारतात महिला एकदिवसीय विश्वचषक होत आहे. त्यामुळे भारतीय महिला संघाकडून मोठ्या अपेक्षा भारतीय चाहत्यांना आहेत. २०१७ मध्ये भारतीय संघ उपविजेता ठरला होता. मात्र, त्यानंतर भारताला उपांत्य फेरीही गाठता आली नव्हती. आता मायदेशात होत असलेल्या या स्पर्धेत भारत पहिला विश्वचषक जिंकण्यासाठी प्रयत्न करेल.

### ऑस्ट्रेलियाविरुद्ध महिला संघ

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, रिचा घोष (यष्टीरक्षक), क्रांती गौड, सायली सतघरे, राधा यादव, श्री चरणी, यास्तिका भाटिया (यष्टीरक्षक) आणि स्नेह राणा.

### विश्वचषकासाठी महिला संघ

संघहरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, रिचा घोष (यष्टीरक्षक), क्रांती गौड, अमनजोत कौर, राधा यादव, श्री चरणी, यास्तिका भाटिया (यष्टीरक्षक) आणि स्नेह राणा.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)